म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
ठाणे

332
म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | लेखक ब. ख. पारख | सन |
| --- | --- | --- |
| काव्य | | |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव दुर्लभरत्न निक्षेपावली | |

आणे.

पद्यात्मक

# दुर्व्यसननिषेधाष्टक.

## बळवंत खंडूजी पारख

यांनीं रचिलें,

तें

मुंबईंत

जावजी दादाजी यांच्या

"निर्णयसागर" छापखान्याचे मालक तुकाराम जावजी
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

क,

पारख,

नासिक.

सन १८९६.

किंमत ६ आणे.

सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व
हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

सं. का ०५

श्रीमंत

सेनाखासखेल समशेरबहादूर,

# सयाजीराव महाराज साहेब गायकवाड सरकार, बडोदें,

ह्यांस

त्यांनीं आपला अमोल्य वेळ खर्चून ता० ३० जानुआरी १८९६ रोजीं यांतील ३६ कडवीं शांतपणें ऐकिलीं ह्या त्यांच्या महदुपकारार्थ व त्यांची सर्व दुर्व्यसनांच्या ठिकाणीं तिरस्कृति आणि सद्व्यसनांच्या ठिकाणीं प्रीति जाणून त्यांच्या चरणीं नम्रतापूर्वक व प्रीतिपुरस्सर पुस्तककर्त्यानें हें लहानसें पुस्तक अर्पण केलें आहे.

नम्र सेवक,

बळवंत खंडूजी पारख,

मु० नासिक.

# प्रस्तावना.

## श्लोक.

नको रे मना क्रोध हा खेदकारी नको रे मना काम नानाविकारी
नको रे मना सर्वदा अंगिकारू नको रे मना मत्सरू दंभभारू.

रामदास.

## आर्या.

कामें कोपें लोभें नागविले अमित यांस जे भुलले
यांच्या कुदृष्टिपातें तेजस्वी पुरुषहीरहीं उळले.

मोरोपंत.

## लावणी.

कामुक होउनि कां मुकतां परमार्थसुखाला देह विका.

रामजोशी.

## अभंग.

दुर्जनाचें भय धरावें त्यापरी पिसाळलें वरी धांवे श्वान.

तुकाराम.

## आर्यार्ध.

न कुसंगतितें घ्यावें आलिंगन ताविल्या पहारेतें.

मोरोपंत.

यक्षापाशीं धर्मराजानें जो तिसरा वर मागितला, तो हा कीं, "जिंकावा कोप लोभ कामहि म्यां." हा असा वर धर्मराजासारख्या पुरुषास देखील मागावा लागला, ह्यावरून, षड्रिपूंचा प्रभाव माणसाच्या मनावर केवढा आहे, आणि तो केव्हांपासून आहे, ह्याचें चांगलें अनुमान करतां येतें.

बाजारांत सगळ्या रोगांवर औषधें मिळतात. परंतु, दुर्व्यसनास औषध मिळत नाहीं. ह्याचें कारण असें आहे कीं, त्यास दुसऱ्याजवळचें औषध उपयोगींच पडत नाहीं. त्यास औषध ज्याचें त्याजवळचेंच पाहिजे. रोग स्पर्शानें जडतात; तसें व्यसन स्पर्शानें जडत नाहीं. तें आपण होऊन जडवून घ्यावें तेव्हां जडतें; तसें तें आपण घालवावें तेव्हां जातें. तें

माणसाच्या हातचें असतें. त्यास औषध ह्मटलें ह्मणजे एक,—पश्चात्ताप होय. तो लोकांपासून घ्यावा लागत नाहीं. त्याची सिद्धता परमेश्वरानें मनुष्याच्या अंत:करणांत ठेविली आहे. तो कोठें आहे तो शोधून पुढें आणणें एवढेंच काय तें माणसाकडे आहे. तरी त्याला कांहीं साधनें लागतात. त्या साधनांत उत्तम साधन उपदेश होय. तो कोणी प्रत्यक्ष उदाहरणांनीं करतात, आणि कोणी नुसत्या शब्दांनीं आणि गोष्टींनीं करितात. एक रोमन बादशाहा होता, तो, कांहीं माणसांस बुद्ध्या दारू पाजवून तिनें त्यांची कशी दुर्दशा होते, तें आपल्या मुलांस, उपदेशार्थ, प्रत्यक्ष दाखवीत असे. त्याप्रमाणेंच, कविजन जे आहेत, ते अशा व्यसनासक्त माणसांचें यथातथ्य वर्णन करून–किंबहुना त्यांचें चित्र पुढें उभें करून–जनांस बोध करितात. आणि त्याचा उपयोग बराच होतो, असा अनुभव आला आहे. आणि हें कृत्य कांहीं सामान्य नाहीं. त्यांत मोठें पुण्य आहे. वाट चुकलेल्या माणसांस वाट दाखविणें आहे. आणखी.—

## आर्या.

**चुकल्या जनास कोणी दावुनि निजहितपथास जो लावी ।**
**धनदेंहि उपकृतीशीं त्याच्या निजसंपदा न तोलावी ॥**

मोरोपंत.

असें ह्मटलें आहे. ह्याहून ह्याचें वर्णन अधिक तें काय करावयाचें आहे. तथापि हा प्रयत्न ह्मणजे फार मोठा आहे. समुद्र आहे. त्यांतला एक अंश मग शंभर खंडींत पावरती कां होईना–पण तो आमचे परम मित्र रा. रा. **बळवंतराव खंडूजी पारख,** नासिककर, ह्यांनीं जनांस सादर केला आहे. हीं पद्यें वाचतांना जोशीबावांची आणि कोठें कोठें फंदीबावांचीही आठवण आमच्या रसिक वाचकांस होईल, अशी आमची खातरी आहे. ह्या पद्यांत प्रसाद चांगला आहे, आणि भाषा सरळ असल्यामुळें, अर्थ चटकदार मनांत येण्यास, आणि अंत:करणांत उपदेश ठसण्यास उशीर लागत नाहीं. आणखी ह्या पद्यांत आमच्या कवींनीं हें एक विशेष केलें आहे

कीं, ह्यांत अलीकडच्या नवीन संपादित व्यसनांच्या परिणामांच्या वर्णनाचाही समावेश केला आहे. ह्मणजे, सध्याच्या काळाला जसे जोशीबावा किंवा फंदीबावा पाहिजेत आहेत, तसे आमचे मित्र **पारख** झाले आहेत. तेव्हां त्यांची ही सुकृति आमच्या सर्व मंडळीस—ह्मणजे ज्यांस हीं व्यसनें आहेत त्यांस पश्चात्ताप होण्यासाठीं, आणि ज्यांस हीं व्यसनें नाहींत त्यांस त्यांपासून आधींच दूर राहाण्याच्या सावधगिरीसाठीं—उपयोगीं पडेल, अशी आह्मांस आशा आहे.

वेगळ्या वेगळ्या पद्यांत वेगळ्या वेगळ्या व्यसनांचें वर्णन करून त्यांचे परिणाम सांगून त्याविषयीं बोध केला आहे. शिवाय ग्रंथाच्या शेवटीं "**दुर्व्यसननिषेध व सद्व्यसनस्वीकार**" ह्मणून एक पद्य—जणुं काय सगळी रात्र व्यसनांत जाऊन पाहांट झाली ह्मणूनच—भूपाळीच्या चालीवर कवींनीं जोडिलें आहे, त्यांत सध्यांच्या आमच्या देशबांधवांनीं करावें काय—ह्मणजे सोडावें काय आणि धरावें काय—हें सर्व फार उत्तम रीतीनें अगदीं उघड करून, जपान देशाच्या उन्नतीचें उदाहरण दाखवून, स्पष्ट केलें आहे; आणखी तें असें आहे कीं, तें आमच्यांतल्या सगळ्या जुन्या नव्या मंडळीस पसंत पडेल.

ह्या पुस्तकाचा उपयोग आमच्या देशबंधूंस चांगला होवो, असें आह्मी परमेश्वरापाशीं मागतों.

**वि. कों. ओक.**

# अनुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
| --- | --- |
| तंबाखू खाणें, ओढणें, हुंगणें, ह्यांचा निषेध. .... .... | १ |
| मद्यपाननिषेधक सन्मित्रोपदेश. .... .... .... .... | ११ |
| विजयासेवननिषेध.... .... .... .... .... .... | १९ |
| अफूच्या दुर्व्यसनांचा निषेध. .... .... .... .... | २४ |
| परस्त्रीगमननिषेध. .... .... .... .... .... | ३० |
| वेश्यागमननिषेध. .... .... .... .... .... .... | ३६ |
| जुगाराचा निषेध. .... .... .... .... .... .... | ४५ |
| दुर्व्यसननिषेध व सद्व्यसनस्वीकार.... .... .... .... | ५२ |



काव्य सं. ८८२

# तंबाखू खाणें, ओढणें, हुंगणें ह्यांचा निषेध.

(फटक्याची चाल.)

तंबाखूचें व्यसन मनुष्या परिणामीं बहु हानिकर[1] ॥
यास्तव तिजला गृहण कराया कधीं नको करूं पुढें कर ॥ ध्रुवपद ॥

कोणी खाती कुणी ओढिती कोणी कोंबिति नाकांत ॥
नागवेलिचें पान सुपारी टाकुनि खाती वर कात ॥
कोणी लावुनि चुना तिला तो चुनेगंचिही तिस वदत ॥
गोळी ठेवुनि तांबूलीं[2] ती कोणी चैनी तिस खात ॥
कोणि ओढितो हुक्क्यामध्यें कोणी ओढी चिलमींत ॥
विडी[3] गुडगुडी शिगार चिरुटें ओढी कोणी चुट्ट्यांत ॥
सांप्रतकाळीं व्यसन फार हें असे पसरलें लोकांत ॥
बाल वृद्ध त्या स्त्रिया पुरुषही तरुण बांड ह्या शोकांत ॥
प्रथम[4] मजेनें ओढुं लागती नंतर जडतें अंगांत ॥
असें व्यसन हें दुष्ट घातकी नको तयाचा संगात[5] ॥
विडी तमाखू पानसुपारी बुडवी पैसा निर्भ्रांत[6] ॥
विडी पाहिजे प्रथम[7] तयाला मध्यान्हाची जरि भ्रांत[8] ॥
अज्ञानानें दुष्ट व्यसन हें घेती बांधुनि पदरांत ॥
कालाच्याही[9] अपव्ययानें करिती जन्माचा घात ॥
खेड्यांमध्यें विड्या पसरल्या नाहीं गणती शहरांत ॥

---

१ हानिकारक. २ विड्यांत तंबाखूच्या गोळ्या टाकून खातात. ३ विड्यांचा ओढण्यांत पहिला नंबर. ४ हें व्यसन प्रथम मौजेखातर ओढतां ओढतांच अंगीं जडतें. ५ सहवास. ६ निःसंशय. ७ अगोदर विडी पाहिजे. ८ जरी दोनप्रहरांची भ्रांति असली तरी चालेल. ९ विड्या फुंकण्यांत किती वेळ व्यर्थ जातो ह्याची गणना केल्यास वर्षांतून दोन महिने होतील.

अह्मां जनांच्या अज्ञानाची सरेल कधिंतरि ही [1]रात ॥
[2]ब्राह्मणास जरि तंबाखूची तलफ लागली रानांत ॥
लंगोटींतिल शेतकऱ्याच्या तमाखु सोडुनि तो घेत ॥
अपायकारक असें व्यसन हें द्यावें झोंकुनि दूरवर ॥
गुणांपरिसंही दोष फार ते ह्यामींच वसती भयंकर ॥
तंबाखूचे भजक वोलती ऐका त्यांच्या ह्या वोला ॥
नमालपत्री परमपवित्री समान तुलसीपत्राला ॥
जे न खाति हिस ते अंतरती सत्यचि [6]माधवपुजनाला ॥
असे द्विजावनकारी ह्यास्तव तिच्या लागलों भजनाला ॥
स्वर्गीं देवें पृच्छा केली इंद्रसभेमधिं त्या विधिला ॥
चार मुखांनीं वरी तमाखू ब्रह्मदेवही त्यां वदला ।
तंबाखूच्या झाडाचीही पृच्छा पंढरिनाथाला ॥
करितां त्यानें हस्त कटावरि ठेवुनि भावचि दावियला ॥
मुखीं नासिकीं ब्रह्मांडीं ह्या गमन जियेचें तिन्ही स्थलां ॥
ह्यास्तव हीतें वदति जान्हवी जी ह्या लोकीं बहु विमला ॥

---

१ अज्ञानाची रात्र. २ ब्राह्मणास तंबाखूची जर रानांत जरूर लागली तर तो बिनदिक्कत शेतकऱ्याच्या लंगोटींतली तंबाखू खातो हें मीं प्रत्यक्ष पाहिलेलें आहे. ३ गुणांपेक्षां. ४ तंबाखू खाणारे ओढणारे. ५ तमालपत्रं परमं पवित्रं रसैर्गुणैर्वा तुलसीसमानं तमालपत्रं नच भक्षयंति ते.– ६ विष्णुपूजां कथमाचरंति ॥ १ ॥ ७ सुपर्णपरिसेवितस्तदनु साधुपूगान्वितो द्विजावनमहापटुस्तदनुसारसंधानभाक् ॥ सदैव सुधयाशनं भवति यस्य विष्णोः समस्तमाखुरिति सेव्यतां भवति वैयतो रागिता ॥१॥ ८ बिडौजाः पुरा पृष्टवान्पद्मयोनिं धरित्रीतले सारभूतं किमस्ति । चतुर्भिर्मुखैरुत्तरं तेन दत्तं तमाखुस्तमाखुस्तमाखुस्तमाखुः ॥ १ ॥ ९ पंढरीच्या विठोबारायांना विचारिलें कीं, महाराज तंबाखूचें झाड केवढें असतें ? तेव्हां त्यांनीं कंबरेवर हात ठेवून तंबाखूच्या झाडाची उंची प्रदर्शित केली !!! १० क्वचित्मुखा क्वचिद्धुक्का क्वचिन्नासिकगामिनी ॥ एषा त्रिपथगामित्वात्तमाखुर्जान्हवीसमा ॥ १ ॥ सारांश हाच कीं ज्यास जें व्यसन असतें तें कितीही निंद्य असलें तरी व्यसनी पुरुष त्यास स्वर्गीं नेऊन बसवितो.

ज्या वल्लीनें लक्ष्मण उठला जीची बहु अद्भुत लीला ॥
मारुतिनें जी महत्प्रयासें आणुनि दिधली वैद्याला[१] ॥
द्रोणाद्रीवरची जी वल्ली[२] तीच तमाखू मुखिं घाला ॥
कोणी ह्मणतो हिच्या प्रतापें साफ होत मज शौचाला ॥
शौचकुपांमधिं[३] विड्या ओढिती मुखीं भरिति कुणि बाराला[४] ॥
विडे खाति[५] कुणि अशा ठिकाणीं नाकीं कोंबिति तपकिरिला[६] ॥
कोणी वदतो वायुहारका महामारका तमाखुला ॥
कोणी ह्मणतो निद्रा येण्यास्तव मी ओढीं गुडाखुला[७] ॥
असे बावळे[८] हे तंबाखे बोलति भलतें अनावर[९] ॥
यास्तव परिसा दोष तियेचे तुह्मांस कंथितों[१०] स्पष्टतर ॥तं० व्य०॥२॥
विड्या ओढिती धूर सोडिती असे लोक हे सांगुं किती ॥
कर्जाच्या पेंचांत येउनी धनकोला[११] ते भरिति मिती[१२] ॥
विडीबाज जे आज दीसती त्यांमधिं अट्टल जे असती ॥
त्यांना बी, डी, पद्वी द्यावी पाहुनि त्यांची अशी स्थिती ॥
पूज्य देवता अग्नि तियेला शौचकुपामधिं पेटविती ॥
मूत्राच्यां[१३] कुंडींत आहुति पितरांना हे जणुं देती ॥
कोणी चैनी विड्या चारशें एक्या दिवशीं फुंकीती ॥
विड्यांस काड्या त्या आगीच्या किती लागती करा[१४] मिती ॥

---

१ सुषेण नांवाच्या वैद्यास मारुतीनें जी संजीविनी आणून दिली तीच ही तंबाखू. २ तंबाख्यांच्या जवळ अशी वल्ली असून ते मरतात हें आश्चर्य नव्हे काय? ३ शेंकडों लोक शौचास जातात तेथें विड्या ओढितात. ४ तंबाखूचा बार भरतात. ५ पानांचे विडे शौचकूपांत जातांना तोंडांत धरून नेतात. ६ तपकीर ओढितात. ७ एक श्रीमंत गृहस्थ निजतांना गुडाखू ओढीत असत. आणि त्यांना ह्याचें कारण विचारतां झोंप उत्तम येते असें सांगत! ८ वेडे. ९ अमर्याद. १० सांगतों. ११ सावकारास. १२ व्याज. १३ फार वाईट गोष्ट कीं, अग्निनारायणास शौचकूपांतील मूत्राच्या कुंडींत टाकितात!!! १४ संख्या, मोजदाद.

कोणी घेती एकचि झुर्का भिरकावुनि देती परती ॥
भरती कोठुनि विड्यांस आली तिची काय ही खिसगणंती[1] ॥
नका गड्यांनो विड्या ओढुं ह्या मड्यासारखी हो[2] कांति ॥
मेंढ्यासम कां उड्या टाकितां निंद्य आपली ही रीति ॥
पड्यावृषां[3]सम दड्या देउनी नका पडूं या आवर्तीं[4] ॥
तेव्हां तुमच्या उद्योगाच्या सत्याब्धीला[5] ये भरती ॥
तंबाखूच्या यज्ञामध्यें यज्ञदीक्षितासम बनती ॥
[6]उत्तम वस्त्रें वा पागोटीं ह्या यज्ञीं तीं होमीती ॥
नको विडीची खोडि तुह्याला गोडी वाटे परि अंतीं[7] ॥
त्रासदायका अशी विडीही त्यागियली गिरिधर[8] संतीं ॥
काळिज बिघडे देहांतरिं तें क्षीणतां[9]हि ये बाहेर ॥
विडी असे हें जणुं मरणाचें सत्य सत्य वा माहेर ॥ तं०व्य० ॥ ३ ॥
तंबाखूमधिं निकोटाइना[10] नामाचें तें विष असतें ॥
जेव्हां करिती हिची परिक्षा भिषक्[11]जनाला तें दिसतें ॥

---

१ खातरजमा. २ होते. ३ पड्या वैलासारखे दुर्व्यसनांत दड्या देऊन राहूं नका. ४ ह्या दुर्व्यसनाच्या भोंवऱ्यांत. ५ दुर्व्यसननिर्मुक्त झाल्यावर उद्योगाच्या समुद्रास भरती येईलच. ६ तंबाखू ओढणारांचीं वस्त्रें कित्येक जळतात. ७ प्रथम गोड पण शेवटीं त्रासदायक. ८ गिरिधरकविराय नांवाचे साधु ह्यांनींही तंबाखू ओढणें किती निंद्य आहे ह्यावर दोन कुंडलिया केल्या त्या अशा:—

"हुक्का बांधे फैटमे नैगहिलीनी हात ॥ चले राहमें जात है बांधि तमाखू सात ॥
बांधि तमाखू सात गैलको धंदा भूल्यो ॥ गई सब चिंता दूर आग देखत मन फूल्यो ॥
कहे गिरिधर कबिराय जु यमको आयो रुक्का ॥ जियलैगयो काल हातमे रहगयो हुक्का ॥
हुक्काहरसे यंवकर कहे मोय समान नहि कोय ॥ कामधंद सब छोडकर भोर भरत है मोय ॥
भोर भरत हे मोय खीचे पंचनमोडोले ॥ तर्र होत है जीव वचन हम मीठा बोले ॥
कहे गिरिधर कबिराय सुनो रे सुक्का ॥ सब घरके मर जाय जन तबहि न छूटे हुक्का ॥

ह्यावरून गिरिधरकविरायांस तंबाखू ओढणें पसंत नव्हतें. ९ विडी ओढणारीं माणसें अगदीं क्षीण दिसतात. १० तंबाखूंत निकोटाईन नामाचें भयंकर विष असतें. ११ डाक्टर वैद्य यांनीं पृथक्करण केल्यावरून त्यांना दिसतें.

तंबाखूच्या पिचकारीनें मनुष्य[1] बेशुद्धचि होतें ॥
कुत्र्यालाही दिली खावया तद्घडि कुत्रें[2] तें मरतें ॥
बिडी ओढितां लागे जेव्हां लागतांचि ती तव[3] येते ॥
भोंवळ[4] येउन उलटी होते गर गर डोकें तें फिरतें ॥
जीव कावरा होय बावरा दांत होति बहु काळे[5] ते ॥
ओंठ दिसति हो जणुं सिद्धीचे[6] ओढितांच बहु काळे ते ॥
कवळ्या[7] काळ्या ठिक्कर पडती मेंदू[8] कुजतो श्रेष्ठमतें[9] ॥
घशांत[10] येती फोड तशी त्या घाण मुखांतुन[11] बहु सुटते ॥
कीट[12] होतसे फुफ्फुसामधि[13] मनुष्य तें बहु दम[14] घेतें ॥
काळजाचिया वरी येउनी फोड त्यांतुनी लस निघते ॥
अन्नीं[15] अरुचि जीभ कोरडी घशांत फारचि खवखवतें[16] ॥
नका ओढुं ह्या दुष्ट विडीला अस्थिर[17] चित्ता ही करिते ॥
अंगा[18] कंडू छाती दुखनी काळिज त्याचें धडधडतें ॥
[19] दृष्टिमंदता दंत[20] भग्नता धातु[21]स्थानहि गडबडतें ॥
कानांनीं नचि ऐकूं येई तोंड [22] पांढरें फिक्कट तें ॥
रक्त बिघडतें[23] त्या मनुजाचें पळपळ आयुष्यहि घटतें[24] ॥

---

१ तंबाखूची पिचकारी देतात त्यावेळीं मनुष्य बेशुद्ध होतें. २ कुत्रें तंबाखूपासून मरतें. ३ घेरी. ४ भोंवड. ५ दांत इतके काळे होतात कीं जणुं काय बाळंतिणीचे दारशिणा लावलेले दांत दिसतात. ६ ओंठ काळे कुळकुळीत सिद्धी निग्रो वगैरे लोकांसारखे होतात. ७ कवळ्या काळ्या होतात. ८ मेंदू कुजतो. ९ चांगल्या समजूतदारांच्या मतानें. १० घशांत फोड येतात. ११ तंबाखे व विड्या ओढणारे अशा लोकांच्या तोंडांची फारच दुर्गन्धी सुटते. १२ मळ. १३ हृदयकमळांत. १४ विडी ओढणारांस फार दम लागतो. १५ अन्नाचे ठायीं. १६ खाज सुटली असें वाटतें. १७ विडीपासून चित्ताची अस्थिरता होते. १८ अंगास खाज येणें. १९ दृष्टिमांद्य. २० दांत पडणें. २१ विडी पिणारांच्या धातुस्थानास कालांतरानें धक्का बसतो. २२ विडी पिणारे पांढरे फटफटीत पंडुरोग्यासारखे दिसतात. २३ रक्तविकार होतो. २४ आयुष्य कमी होतें.

तंबाख्यांला अन्न[1] जिराया धक्का बसतो अनिवार ॥
कारण त्यांची लाळ जातसे थुंकतांचि ती बहुवार ॥ तंबाखूचें व्य.॥
तंबाखूच्या विड्या ओढिती हिशेब याचा तुह्मी करा ॥
होतो रुपया खर्च तयाचा दो महिन्यांनीं[2] स्पष्ट पुरा ॥
हा गरिबांचा मार्ग तुह्माला कथिला ज्यांची प्राप्ति जरा ॥
परंतु रीति श्रीमंतीची फार असे ती भयंकरा ॥
शौचकुपामधिं[3] जयां लागती विड्या ओढण्या त्या बारा ॥
महिन्याचा हा हिशोब करितां रुपये होती ते तेरा ॥
पान तमाखू मिश्रित करुनी तोंडीं भरिती त्या बारा ॥
तेव्हां वदती शब्द बोवडे अंगेरख्याचा मातेरा ॥
"टुमी टॅमाखू[5] खाटा कांहो" ही शब्दांची असे तऱ्हा ॥
पिचकाऱ्यांनीं रंगपंचमी तंवाख्यांच्या ह्या वस्त्रां ॥
विड्यांपासुनी आग लागली कितीक लोकांच्याहि घरा[6] ॥
गवताचे ते गंजे[7] पेटले कितीक मोठ्या वखारा[8] ॥
तंबाखूचा धूर[9] ओढणें अतिशय मारक हा शरिरा ॥
त्याहुनि तांबूलामधिं[10] खाणें मार्ग वाटतो कांहिं बरा ॥

---

१ अन्न जिरण्याचें मुख्य साधन लाळ, ती लाळ विडी ओढणारे, चिलमे, तंबाखे ह्यांची वारंवार थुंकल्यानें कमी होते, ह्यामुळें त्यांचें अन्न जिरण्यास अडचण पडते. २ दररोज पाव आण्याच्या जरी विड्या ओढिल्या तरी दोन महिन्यांत एक रुपया खर्च होतो. ३ परसाकडेस जातात तेव्हां ज्यांना एकेक डझन ह्मणजे १२।१२ विड्या ओढण्यास लागतात असे जे अट्टल विड्या फुंकणारे ह्यांस दररोज सात आण्यांच्या विड्या लागतात यावरून महिन्यास सहज १३ रुपये खर्च येतो. ४ तंवाखू खाणारे जे पटाईत बहाद्दर आहेत त्यांच्या छातीघोळ अंगरख्यावर जणुं रंगपंचमी खेळते असा तो तांबूलाचा रंग दिसतो. ५ तंबाखू तोंडांत ठेवून बोलणाराच्या शब्दांचा फारच चुथडा उडतो. तच्या जागीं ट ह्याप्रमाणें. ६ विड्यांपासून कितीकांच्या घरांस आग लागली आहे. ७ कितीक गवताच्या गंज्या पेटल्या. ८ कित्येक वखारी जळाल्या. ९ धुराचें पान फार वाईट आहे. १० विड्यांत खाणें बरें पण दांत काळे, व तोंडास दुर्गंधिही त्यापासून तयार!

तपकीरीचें सेवन बरवें परी नासिका येइ झरा[1] ॥
ह्मणूनि सर्वोपरी निंद्य ही अशी तमाखू दूर करा ॥
कितीक विद्वानांच्या मस्तकीं विलसे पदवीरूप[2] तुरा ॥
परंतु वाटे नवल विडीला ओढितांच सोडितां धुरा[3] ॥
जो ह्या व्यसना जिंकी लोकीं तोच धन्य तो शूर नर ॥
ह्याहुनि तंबाखुचे दोष ते तुह्मास सांगूं कोठवर ॥ तंबाखू० ॥ ९ ॥
तपकिर ओढुनि ज्या फडक्यानें[4] नाक तपकिरे शिंकरिती ॥
त्याविषयींची सज्जन जन हो आपण ऐकावी रीती ॥
श्लेष्मोदधिला[5] ह्या तपकिरिनें तेव्हां येई बहु भरती ॥
रुमाल काढुनि त्यांत साठपा[6] ह्या द्रव्याचा[7] ते भरिती ॥
करद्वयें तो रुमाल धरुनी आंतिल द्रव्या[8] चोळीती ॥
नेत्रांजवळी आणुनि त्यातें उघडुनि दृष्टीनें बघती ॥
जैसीं श्वानें[9] करूनि विष्ठा नंतर तीतें हुंगीती ॥
त्यापरि तपकीऱ्यांची रीती सांगुं कोठवर सुजनां ती ॥

---

१ तपकिऱ्यांच्या नाकास पाझर सुटतो. २ चांगले शिकलेले बी. ए., एम. ए., एल्. एल्. बी., असले विद्वान् ह्या दुष्ट विड्यांचें सेवन करितात हें पाहून फारच आश्चर्य वाटतें. मी स्वतां विडी पिणारा नाहीं पण धूम्रपानोज्झितक्रिया (धूर सबंध गिळून कांहीं वेळानें काढणें ) असा प्रकार करीत होतों. पण जेव्हां ह्या धुराचा हा दुष्परिणाम ऐकिला तेव्हांपासून ह्या क्रियेस फांटा दिला. ३ एका संस्थानांत माझे एक मित्र पदवीधर आहेत ते अत्यंत गुणी, विद्वान्, ग्रंथकार, कवि असे सद्गुणमंडित पंडित असून दररोज विड्या मात्र अमर्याद ह्मणजे एका दिवसांत चारशें फुंकितात !!! ४ तपकिऱ्यांचें नाक पुसण्याचें फडकें ( त्या तपकिरीचा खजिना ). ५ शेंबडाच्या समुद्राला. ६ सांठा, संचय. ७ नाकांतील तपकिरीनें तांबड्या रंगाचा झालेला श्लेष्मा. ८ तपकिऱ्यांची ( कांहीं कांहीं लोकांची ) अशी गोष्ट पहाण्यांत येते कीं, नाक शिंकरून ज्या फडक्यांत तो नासिकास्थ मलसंचय करितात, तें फडकें दोन्ही हातांनीं चोळून मग वारंवार तें फडकें उघडून पहात असतात. ९ कुत्र्यांची स्वाभाविक खोड अशी असते कीं, विष्ठा केली ह्मणजे तीं हुंगून नंतर तेथून चालतात; तोच प्रकार पुष्कळ तपकीर ओढणारांचा असतो. ह्मणजे

वेळ रिकामी बघती जेव्हां तेव्हां नासिक कोरीती ॥
त्यांतील सुकल्या तपकीरीच्या गोळ्या कितीक जन करिती ॥
चिलीम गुरगूडीला[१] चिलमे रत्नासमान ते गणती ॥
चिरूट[२] चिलमी अशा अंमला विटाळ नाहीं हे ह्मणती ॥
ज्यापाशीं ते नसती पैसे मानव ऐसें जे असती ॥
व्यसन विड्यांचें ज्यां वेड्यां ते घालिति रस्त्यावर गस्ती[३] ॥
विड्या चिरूटें जनें ओढुनी टाकुनि दिधलेलीं दिसती ॥
तींच ओढुनी करिति तृप्तता ह्या अमला ते शमवीती ॥
संभावित जन ह्मणती आह्मी विड्या ओढितों विलायती ॥
पुटें[५] कशाचीं त्या चिरुटांना तमाखुला हीं असतीं तीं ॥
तंबाख्या हा थुंकेल[६] कोठें नसे तयाचा इतबार ॥
ह्मणूनि टाका अशी तमाखू हाच तुह्मां कथितों सार ॥ ६ ॥

---

ते नाकांतील शिंकरलेल्या द्रव्याचा देखावा पाहून मग नाक पुन्हां शिंकरतात. मी एके वेळीं एक यूरोपियन तपकीर ओढणारे पाहिले; त्यांचें फडकें जणुं तपकिरी-रंगाचेंच मूळचें असें झालेलें दिसलें, त्यावरून मीं त्यांच्या नौकरास विचारिलें कीं, हें फडकें इतकें काळेंकुट्ट कां झालें? त्या नौकरानें सांगितलें, असले चार रुमाल दररोज काळेकुट्ट होतात. मूळचे ते अगदीं शुभ्र असतात ! ! तपकिऱ्यांचें चरित्र केरळकोकिळांत फार चटकदार आहे तें पहा !

१. "सभारत्नानि गुरगुडी" असलीं अप्रयोजक वाक्यें त्यांचीं असतात. २ चिरूट, चिलीम, चुना, चुंबन इत्यादिकांस विटाळ नाहीं असे हलकट शब्द चिलमे लोक बोलतात. ३ फेऱ्या. ४ गरीब असून हें विड्यांचें व्यसन त्यांना जडल्यावर जवळ दिडकी न मिळाली ह्मणजे हे लोक रस्त्यावर सांपडलेल्या विड्या किंवा अमंगल जागेंतील सांपडलेल्या विड्या ओढून आपल्या अमलाची पूर्तता करितात ! ५ बहुधा विलायती चिरूटें किंवा मद्रासेकडील चिरूटें ह्यांच्या पानांस ब्रांडीचीं पुटें असतात असें सांगतात. ६ "तंबाखू खाणारा कोठें थुंकेल आणि दारू पिणारा काय भकेल ह्याचा नेम नाहीं" अशी मराठी भाषेंत म्हण आहे. त्याचप्रमाणें "मागतां येईना भीक तर तमाखू खायाला शीक" अशीही एक ह्मण आहे.

गुरुगूडीला टाकुनि मनुजा घ्यावी अक्षय [1]गुरुगोडी ॥
तंबाखूचा धूर त्यजुनियां प्रापंचाचा [2]धुर सोडीं ॥
टाक वेळुची दूर नळी ती [3]क्षमा नळी ही तूं ओढीं ॥
तमाखूस दे दूर झोंकुनी [4]तम शत्रूचें शिर तोडीं ॥
विवेक [5]मेरू ह्यावर शांतिस्वरूप चिलमीला जोडीं ॥
मग तूं मिळविशि सत्य सत्य बा [6]पुरुषार्थांची तुज जोडी ॥
विडी सोड ह्या [7]दुस्संगाची सत्संगाला करी गडी ॥
धरीं नम्रता तशी सत्यता त्याग मनांतिल दुष्ट अढी ॥
त्यागुनि दे तपकीर करीं तूं कीर्तिपातें एक घडी ॥
दुष्ट [9]दुराशारूप घराला बळकट घालीं सदां कडी ॥
विडी तमाखू तपकीरीला औषध ह्मणूनि तूं ओढीं ॥
[10]तीचं सदोदित जडते अंगा ह्या व्यसनाची ही खोडी ॥
ओढितसें [11]मी ह्या तपकिरिला कारण माझी नाकपुडी ॥
बंद होउनी रक्त येउनी त्रास होय मज हारघडी ॥

---

१ गुरुगुडी त्यागून सद्गुरुगोडी घे. २ प्रापंचांत अहंपणाचा जो धूर तो सोड. ३ क्षमा हीच नळी ( गुडगुडीचा नैचा. ) ४ तंबाखूबद्दल तम शत्रूचें शिर तोड. ५ मेरू ( गुडगुडीचा मध्य ) हा त्यागून विवेकरूप मेरू घे. ६ धर्म, अर्थ, काम, मोक्षादि. ७ वाईट संगतीची विडी सोड. ८ दृढतर अशाप्रकारच्या तपाला. ९ दुराशेच्या घरास बळकट कडी घाल. १० औषधाकरितां जरी कोणी दुर्व्यसन स्वीकार करील तरी तीच खोड जन्माची सोबतीण होऊन बसते. ११. मी स्वतः तपकीर ओढतों ह्याचें कारण सन १८७९ सालीं मला मोठें दुखणें झालें त्या दुखण्यांत माझ्या उजव्या नाकपुडींतून फार रक्त गेलें तेव्हां कै० रावबहादूर बाबासाहेब देशमुख ह्यांनीं मला तपकीर ओढण्यास सांगितलें होतें ती थोडी थोडी ओढतांच अंगीं जडली. आतां सहा आण्याचा मद्रासी तपकिरीचा पुडा तीन महिन्यांनीं घ्यावा लागतो ! !

गिरिधर कविराय हे माझ्यासारखेच तपकीर ओढणारे असावे असें त्यांच्या तपकिरीच्या स्तुतिपर कुंडलियेवरून दिसतें ती कुंडलिया अशी:—

सुंगणी सुंगे प्रेमसो नेम सहित परभात ॥ करे मगज रोषन सदा नजला सब झड जात ॥
नजला सब झड जात दांत पावे दृढताई ॥ नैन चैन मे रहे बेन बोले शिर साई ॥
कहे गिरिधर कविराय कामकूं कबू नहि उंगे ॥ सकल गुणनकी खान तके नर सुंगणी सुंगे ॥

ओढतांच मज खोड लागली महिन्या लागे एक पुडी ॥
दोन अण्यांची व्यावि लागते ह्यास्तव सोडीं ही खोडी ॥
पानसुपारी अपायकारी टाकुनि द्या तंबाखु विडी ॥
तशी गुडाखु ह्या व्यसनांची तोडुनि टाकीं दुष्ट [1]बिडी ॥
अनाद्यनंत श्रीपरमेश्वर भजा तुह्मी तो परात्पर ॥
हीच विनंती तुह्मांस [2]अंतीं पारख करितो निरंतर ॥ तंबाखूचे० ७

---

१ व्यसनरूप शृंखला तोडून टाक. २ शेवटीं.



# मद्यपाननिषेधक सन्मित्रोपदेश.

( श्रीरंग गोपिकोत्संग ह्या चालीवर. )

तूं[1] नको पिऊं हें मद्य गमे तुज हृद्य[2] प्राशितां अद्य[3] गोड बहु मित्रा ॥
परि शेवटिं तुजला भीक घालिना कुत्रा ! ! ॥
दुर्गंधि[3] मुखांतुनि फार येइ जइं तार होय बेजार मद्यपी भारी ॥
सोडिल्या मद्य हें होइन तव आभारी ॥
मद्यपी बहुत बेंडबडे अंग हडबडे जीभ लडबडे मुखामाझारी[6] ॥
पाहुनी त्रासती बंधु मुलें शेजारी ॥
फार हो धनाचा नाश गळीं ये फांस होतसे खास कर्जबाजारी[7] ॥
परि दमडी कोणी देई नचि बाजारीं
चाल ॥ मद्यपी गटारीं लोळे, मोरित ॥ चोर त्या जवळचे गोळे चोरित ॥
नेति त्या शिपाई टोले मारित ॥
पहिली चाल ॥ टाकूनि गाइचें दुग्ध होउनी मुग्ध[8] जणूं संदिग्ध[9] प्राशिती
मूत्रा ॥ नचि यांची कांहीं आस बायकांपुत्रां ॥ १ ॥ तूं नको पिऊं० ॥ १ ॥
मद्यपी जाय गुत्त्यांत[10] हर्ष देहांत पसरुनी हात घेइ टमरेला[11] ॥
तई विसरे अपुल्या काय असे कमरेला ॥
टमरेल कीती तें गोड ! ! लावीती तोंड अंत्यजहि[12] गोंड वगैरे ज्याला ॥

---

१ मनोहर. २ आज. ३ मद्यप्याच्या तोंडाचा वास अत्यंत वाईट येतो. ४ गुंगी. ५ मद्यपी अशी बडबड करितो कीं जणुं त्यास वेड्या मधुऱ्याचें दुखणें होऊन ही बडबड करितो असें वाटतें. ६ मध्यें. ७ दारूपासून हजारों लोकांची खराबी होऊन सावकारांनीं कर्जाबद्दल घरादारांचा शेतापोतांचा लिलांव केला आहे. ८ मंदमति. ९ संशयात्मक. १० दारूचा मक्ता ठरलेल्या पिठ्यांत. ११ मद्यपानपात्राला ( टीनचें किंवा काचेचें भांडें ) त्याला. १२ पिठ्यांत दारू प्यावयास येणाऱ्या जाती महार, मांग, गोंड ह्यांचें उष्टें भांडें घेऊन मराठे, शिंपी सोनार वगैरे जातींचे लोक खुशाल दारूचे घुटके घेतात ! ! !

हा मानी त्याला जसा सुधेचा[1] प्याला ॥
जातात सुमार्गीं[2] झोंक फजीती रोख ओकतां लोक पाहुनी त्याला ॥
ह्मणतात नसे हा जिवंत सत्यचि मेला ॥
चाल ॥ लागतो खरोखर बट्टा अबरुशीं ॥ उमजेना केल्या थट्टा गैब- रुशीं[3] ॥ नचि सोडी धरुनी हट्टा दारुशीं ॥
चा० प० ॥ बहुपात ह्या कुँपापांत[4] असुनि ऽंयापांत[5] कालचापांत[6] पडत ही जत्रा ॥ कां पापयुक्त ह्या करितां पुँण्यक्षेत्रा[7] ॥ तूं नको० ॥ २ ॥
हे पिठे बघुनि शिर उठे हृदय ही फुटे जाति अडमुठे[8] टाकुनी लाजा[9]॥
जो स्थापि पिठ्या तो जाणुन परका राजा[10] ॥
शक्तिही व्हावया क्षीण बुद्धिनें हीर्ण[11] शिरावरी रीर्ण[12] करुनि कारा[13] जा ॥
अपकीर्ति वांटली जगांत दारूबाजा ॥
हें नव्हे व्यसन[14] नेटकें बहुत ने[15] टके करुन मुख फिकें रुदन करि भाजा[16]॥
त्यागूनि मद्य हें सत्पथ[17] तूं घर जा जा ॥
चा० ॥ बेवडा वगैरे ब्रांडी पान रे ॥ नरकाची केवळ हंडी जाण रे ॥ किति जमवुनि जातां झुंडी[18] वानरें ॥
चा० प० ॥ परिणाम फार वाईट येऊंदे वीट होउनी धीट पठण कर शास्त्रा ॥ दे टाकुनि दुर्धर ह्या दारूच्या अस्त्रा[19] ॥ तूं नको पिऊं०॥३॥

---

१ अमृताचा प्याला. २ चांगल्या रस्त्यांवर दारूडे लोक झोकांड्या खातात. ३ शरीरसंपन्न. ४ वाईट पापांत. ५ उपद्व्यापांत. ६ कालाच्या धनुष्यांत. ७ नरदेह हेंच पुण्यक्षेत्र झाला. ८ अडाणी ( अज्ञान ). ९ लज्जा. १० आपलें दयाळू सरकार लोकांच्या सोयीकरितां गांवोगांव शहरांतील गल्लोगल्लींत शेंकडों पिठे स्थापून दारूपासून लक्षावधि रुपयांची किफायत करितें; पण कोणी जर स्वतःच्या शेतांतील मोह काढून त्याची दारू गाळील तर त्यास ६ महिन्यांची शिक्षा व दोनशें रुपये दंड ठोठावतें ह्यांचें कारण लोकांत दुर्व्यसनांचा फैलाव होतो व पिठ्यांपासून मात्र परोपकार होतो याचें नांव न्याय ! ! ! ११ हीनत्व. १२ कर्ज. १३ कारा. ( तुरुंग ) दारूबाजीपासून लक्षावधि लोक तुरुंगांत गेले आहेत. १४ चांगलें. १५ पैसे. १६ बायको. १७ चांगला मार्ग. १८ टोळ्या. १९ मंत्रा.

मनुजास सुरा करि [1]भ्रांत शेवटीं [2]अंतें पाप [3]निभ्रांत सुरेच्या ठायीं ॥
प्राशिल्या नोळखे दुहिता [4]भगिनी आई ॥

श्रीमंत असुनि [5]धीमंतें बहुत गुणवंत वदति त्या [6]जंतें मद्य जो घेई ॥
बायकामुलांना [7]वीटें तयाचा येई ॥

मद्यांत असे जो दंग होय [8]निर्स्संग तयाचें अंग [9]धोदरुनि जाई ॥
ही दुष्ट बाटली हृदय तयाचें खाई ॥

चा० ॥ [10]दुर्गतिची माता आहे ही सुरा ॥ राक्षसीसारखी वाहे [11]भया-
सुरा ॥ शास्त्रामधिं निश्चय पाहे हा पुरा ॥

चा० प० ॥ जो करी सुरेचें पान [12]कवीनें आण घातली जाण प्राशितां
[13]छात्रा ॥ तूं पठण करी एकवार शुक्रचरित्रा ॥ तूं नको० ॥ ४ ॥

दुर्व्यसन बहुत हें नीच असुनियां [14]उच्च जातिचे साच भ्रष्टुनी जाती ॥
बरि त्यांच्या जातीमधीं पडे ही माती ॥

जो राजवंशभूषण ज्यास दूषण येत [15]भीषण वेळ ज्यावरती ॥
त्या [16]संभाजीची होय कशी ती रीती ॥

[17]दुर्मंत्री त्याचा भ्रष्ट कलूशा दुष्ट तयासह नष्ट होय तो अंतीं ॥

---

१ भ्रमिष्ट. २ मरण. ३ निःसंशय. ४ एकदां दारू प्याला ह्मणजे त्यास मुलगी बहीण आई यांची बिलकूल ओळख रहात नाहीं. ५ बुद्धिवान्. ६ मद्यप्यास जंताची उपमा योग्य, कारण जंत जसा नरकांत पचतो तद्वत् दारूबाजही नरकांतच पचतो. दारूची घाण नरकापेक्षां वाईट ! ७ तिरस्कार. ८ निर्लज्ज. ९ रक्तपितीसारखें दारूबाजाचें अंग सुजतें. १० नरकाची. ११ भयंकर. १२ शुक्राचार्यानें. १३ शिष्यास ( देवगुरूचा पुत्र कच ह्यास राक्षसांनीं मारून त्याची राख मद्यांत मिळवून तें मद्य शुक्राचार्यास प्यावयास दिलें त्यामुळें शुक्राचार्यास कन्येच्या आग्रहामुळें कचास संजीविनी विद्या सांगणें भाग पडलें तेव्हां शुक्रानें दारू पिणारास असा शाप दिला कीं जो ब्राह्मण आजपासून दारू पिईल तो भ्रष्ट. १४ उंच जातीचे लोक दारू प्याल्यानें भ्रष्टतात. १५ भयंकर. १६ संभाजीराजास पकडलें तेव्हां तो दारूच्या अमलांत होता. १७ वाईट प्रधान.

महाराष्ट्र रडे हें करुनि शिवाची[1] खंती ॥

चा० ॥ ह्यासाठिं मद्य हें सोडी मारक[2] ॥ धरि भगवन्नामीं[3] गोडी तारक ॥
होशील भक्तिची जोडी धारक[4] ॥

चा.प.॥ जरि अशांत उमजे तुला आण हेतुला[5] सोड दारुला पढुनि ह्या पत्रा ॥
तूं बुडसि सत्य जरि नायकसी ह्या मंत्रा ॥ तूं नको० ॥ ५ ॥

बिघडवी सुरा प्रकृति[6] करी विकृति[7] सत्य यकृतीं[8] करुनि करि नाशा ॥
ह्यासाठिं सुरेची सोड सोड तूं आशा ॥

यकृतांत होतो दहा[9] विद्रधी[10] महा होतसे पहा कुव्यसनें[11] ऐशा ॥
ह्या रोगासंगें खराब करितो पैशा ॥

काळीज होतसे अल्प[12] मृत्यु मग स्वल्प करुनि संकल्प गळीं घे पाशा[13] ॥
ह्यास्तव तूं सोडुनि मद्य भजे श्रीईशा[14] ॥

चाल ॥ शेवटीं जलोदरें[15] प्राणा नेतसे ॥ दारुनें हानि सन्माना येतसे ॥
॥ मद्यपी संकटें नाना घेतसे ॥

चा.प.॥ ह्मणुनियां करी तूं त्वरा सोडि ह्या गरा[16] ईशपद तुरा करुनि कर छत्रा[17]
गुरुचरणां जाईं शरण मिटिशि कां नेत्रां ॥ ६ ॥ तूं नको० ॥ ६ ॥

---

१ शिवाजीमहाराज छत्रपति ह्यांचें स्मरण करून महाराष्ट्रदेश रडला, कारण ते अत्यंत पवित्र, मोठे स्वदेशाभिमानी, महाराष्ट्रराज्यसंस्थापक, शूर, यवनलांडग्यांवर तुटून पडणारे केसरी असे असून हा त्यांचाच पुत्र पण दुर्व्यसनी, दारुबाज, निर्दय अशा दुर्गुणांचा पुतळा सूर्याच्या पोटीं शनैश्चर उत्पन्न झालेला पाहून महाराष्ट्रदेश खंती करून रडला. २ मारणारें. ३ ईश्वरनामाचे ठायीं. ४ धारण करणारा. ५ अभिप्रायास. ६ अंगस्वभाव. ७ विकार, रोग. ८ काळजाचे ठायीं. ९ काळजांत दहा होतो. १० काळजाच्या जागीं एक गोळ्यासारखा विकार मद्यानें होतो तो विद्रधि. ११ वाईट व्यसनानें. १२ काळजाचें आकुंचन होतें. १३ फांसाला. १४ ईश्वरास. १५ जलोदर रोग हा बहुधा दारूच्या सेवनापासून होतो असें मोठमोठे वैद्य म्हणतात. १६ विपास. १७ ईश्वराच्या चरणांची छाया डोक्यावर धर.

मद्यप्या कळेना धर्म[1] अधर्मी कर्म दुःखसुखवर्म सोडिलें ज्यानें ॥
होतसे मदात्यय[2] रोग मद्यपानानें ॥
अर्थ[3] ना अनर्थ क्रोध मृत्यु उन्माद हिताहित भेदलुप्त हो पानें ॥
मद्यपीशरीरीं अपस्मार[4] दे ठाणें ॥
दारुचा जनक हा मोह शरीरीं मोह[5] भीतिचा[6] डोह होय दारूनें ॥
हृत्पीडा[7] शोक क्षोभ होय अज्ञानें ॥
चाल॥ छातींत बाण लागेसा वाटतो ॥ निद्रेंत असुनि जागासा ऊठतो॥
बैसला असुन पळतोसा समजतो ॥
चा० प० ॥ स्मृतिचाहि होय विभ्रंश[8] करी उत्क्लेश[9] बुद्धिचा लेश नसे त्या गात्रा[10] ॥ ह्यास्तव तूं दूरी टाक दारुच्या पात्रा ॥ तूं नको० ॥ ७ ॥
होतसे अरुचि[11] विड्भेद[12] येई बहुस्वेद[13] शोथ[14] जणुं मेद वाटतो लोकां ॥
चित्तास भ्रंश[15] ये मूर्च्छा[16] आणी शोका[17] ॥
कटिभाग[18] पडतसे ढिला दमा खोकला घेत गिरकिला मद्यपी झोका ॥

---

१ मद्यप्यास धर्म-अधर्म, सुख-दुःख कळत नाहीं. २ मदात्ययरोग वायूच्या लक्षणासारखा होतो. ३ अर्थ अनर्थ हिताहित कळत नाहीं; मद्यापासून उन्माद होऊन शेवटीं मृत्यु येतो. ४ मद्यापासून अपस्मार होतो. ५ दारूपासून मोह होतो; वास्तविक म्हटलें असतां दारू ही मोहापासून होते, पण अघटित घटनेप्रमाणें दारूपासून मोह होतो. ६ दारूबाजांस एक प्रकारची भीति वाटत असते. ७ हृदयांत पीडा होते, शोक वाढतो. ८ हा मी कीं तो मी हेंसुद्धां दारूबाजास कळत नाहीं; ह्याप्रमाणें बुद्धिभ्रंशाही स्मृतिभ्रंशासारखा होतो. ९ आतां ओकारी येईल असें वाटणें. १० दारूबाजाचे शरीराचे ठायीं बुद्धि हा पदार्थ काय असतो ह्याची ओळखच नाहीं. ११ मद्यपी लोकांच्या तोंडास रुचि नसते म्हणूनच डोस झोंकल्याबरोबर चणे फुटाणे ते माकडासारखे चावतात. १२ परसाकडेला साफ न होणें याचें नांव विड्भेद. १३ मद्यप्यांस घाम फार येतो. १४ तोंड व आंग सुजल्यासारखें होतें. १५ मद्यप्यास अक्षय भ्रम असतो. १६ भोंवळ. १७ मद्यपी एखादे वेळेस असे रडतात कीं बोलायाची सोय नाहीं. १८ मद्यप्यांची कंबर ढिली पडून हाडें बरगड्या दुखतात, गिरक्या घेतात, झोंके खातात शेवटीं गटारांत पडतात.

अपतानक[१] कंप[२]हि तृष्णा[३] मागे उदका ॥
करवि हें अगम्यागमन[४] दुष्ट आचरण अखडवी[५] चरण देत बहु धोका ॥
ह्मणुनियां मद्य हें त्यागा शास्त्रा घोका ॥
चाल ॥ बहु दुःशिलतेचें[६] स्थान मद्य हें ॥ वाईट गोष्टिची खाण मद्य हें ॥
जणुं मोरीमधली[७] घाण पाँन हें ॥
चा० प० ॥ करवि हें गोपनस्फोट[८] थरकवी ओष्ठ बिघडवी कोष्ठ[९] अशा
अपवित्रा ॥ तूं स्पर्श नको करुं कधीं भरतभूपुत्रा ॥ ८ ॥ तूं नको० ॥
ही सुरा दिसे सुंदरा[१०] परी वांगुरा[११] मद्यपीगुरां पाडण्या फांशीं ॥
[१२]ही ताडी १ माडी २ द्राक्षा ३ गौडी ४ राशी ५ ॥
मी कोण करीतों काय भेद हा जाय बाप ना माय आठवे त्याशीं ॥
हठकून अग्निच्या तोंड लावि भात्याशीं ॥
वाढवी शरीरीं पित्त शोषिते रक्त नरा करि मत्त धातुला नाशी ॥
मस्तकीं शूल उदरांत करी वाताशी ॥
चाल ॥ ही खून करवि कलहास पेटवी ॥
॥ दारिद्र्यदुःख उपहास भेटवी ॥
॥ गर्दभापरी देहास लोळवी ॥
चा०प०॥ श्रीतुकाराम सद्भक्त नीच गणि शाक्त अभंगीं सक्त देत त्य।
मात्रा॥तूं वाच तयाच्या शाक्तांवरच्या[१३] सूत्रा ॥ तूं नको पिऊं हें०॥९॥

---

१ एकप्रकारचा वातजन्य व्याधि. २ मद्यपी लोकांच्या आंगांत कंप असतो. ३ तहान. ४ मद्यपी एकवेळ अमलदार झाला ह्मणजे त्याचें कोठें गमन होईल हें सांगवत नाहीं. ५ हात पाय आंखडतात. ६ वाईट स्वभावाची जागा. ७ मद्यपान हें जणुं मोरींतलें पाणी असें त्याच्या घाणीवरून कळतें. ८ मद्यपी आपल्या गुप्त गोष्टी अमलांत स्पष्ट सांगतो. ९ कोठा. १० चांगली (पांढरी, तांबडी, पिंवळी इ०). ११ जाळें. १२ ताडाची, माडाची, द्राक्षांची, गुळाची, मोहाची. १३ श्रीतुकाराममहाराजांनीं शाक्तमताच्या नरपशूंवर यथास्थित चांगली खरमरीत टीका केली आहे, त्यांतील कांहीं वेंचे ह्याखालीं देतों ते पाहून तरी आमचे दारूबाज देशबांधव कांहीं ताळ्यावर येतील:–

एककरी शक्तिपूजा ॥ यंत्र वोजा अवर्ण ॥ १ ॥
काय त्याचें थोरपण ॥ ठायीं अन्नपान तें ॥ २ ॥
मद्यपात्र मुखीं जाण ॥ अपोषण बुडालें ॥ ३ ॥
तुका, सांडूनि आचार ॥ अनाचारें वर्तती ॥ ४ ॥ ६१८१ ॥
नाहीं वेदांची मर्यादा ॥ वर्ते अनाचार सदा ॥ १ ॥
काय ह्मणावें तयाशीं ॥ मूर्तिमंत पापराशी ॥ २ ॥
नाहीं द्यावया उपमा ॥ दुजा पापी झाली सीमा ॥ ३ ॥
तुका ह्मणे शाक्त ॥ बेटा भोगी अधःपात ॥ ४ ॥ ६१८४ ॥
शाक्त गधडा जये देशीं ॥ तेथें राशी पापाच्या ॥ १ ॥
सुकृताचा उदो केला ॥ गोंधळ घाला इंद्रियें ॥ २ ॥
क्रोधरूप वसे काम ॥ तिचें नाम जपतसे ॥ ३ ॥
मद्यभक्षण मांगिण जाती ॥ विटाळ चित्तीं साठविला ॥ ४ ॥
स्तवूनियां पूजी रांड ॥ न लजे भांड दाढीशीं ॥ ५ ॥
तुका ह्मणे भगवती ॥ नेइल अंतीं आपणापें ॥ ६ ॥ ६१९१ ॥
शाक्तांची ती शूकरी माय ॥ विष्ठा खाय बिदीची ॥ १ ॥
तिची त्या लागली सवे ॥ मागें धांवे ह्मणूनी ॥ २ ॥
शाक्तांची गाढवी माय ॥ भुंकत जाय वेसदारा ॥ ३ ॥
तुका ह्मणे शिंदळीचे ॥ बोलतां वाचे निंद्य ते ॥ ४ ॥ ६१९६॥
मागें संतीं होतें जें जें सांगितलें ॥ तें येऊं लागलें अनुभवा १
आचारभ्रष्ट होती लोक कळीं॥ पुण्य क्षीण वळी झालें पाप २
वर्णधर्म कोणी न धरी विटाळ ॥ घालिती गोंधळ एकेठायीं
वेदाचे पाठक सेवितिल मद्य ॥ न देखती भेद विषयीं भांड ४
तुका ह्मणे किती करावे फजित ॥ तेचि छंद नित्य बहू होती
॥ ५ ॥ ६२०३ ॥
ऐका कलीचें हें फळ ॥ पुढे होईल ब्रह्मगोळ ॥ १ ॥
चारी वर्ण अठरा याती ॥ भोजन करिती एके पंक्तीं ॥ २ ॥
पूजिती असुरा रांडा ॥ मद्य प्राशितील पेंढा ॥ ३ ॥
वाम कवळ मार्जन ॥ जन जाईल अधःपतन ॥ ४ ॥
तुका हरीभक्ति करी ॥ शक्ति पाणी वाहे घरीं ॥ ५ ॥ ६२२४॥
ऐसें कलीचें महिमान ॥ वर्ते अनिवार जन ॥ १ ॥
नवनीता न पुसती ॥ सर्वकाळ सुरा पिती ॥ २ ॥

यापरी मित्रहितकर बोल सुखकर ऐकुनि शिर नमवुनी त्याला ॥
तो[१] पश्चात्तापें त्यास बोलता झाला ॥
उपदेश तुझा परिसून[२] आजपासून दिलें निरसून[३] सुराव्यसनाला[४] ॥
मी होतों अजवरि दुर्गंधींचा नाला[५] ॥
मित्र तूं मिळुनियां नदी आपणामधीं मिळवुनी कुधी[६] सुधी[७] त्वां केला॥
सेवीन ह्मणे मी सदां तुझ्या वचनाला ॥
चा० ॥ सन्मित्र सुखाचे दाते सज्जन ॥ करविलें मशीं तीर्थातें मज्जन[८] ॥
सेवितील या अर्थातें जे जन ॥
चा०प०॥ ते सुखांत हा संसार तरुनियां सार भोगितिल फार सौख्य परत्रीं[९]॥
देतसे मद्यप्या पारख तारक[१०] मात्रा ॥ तूं नको पिऊ०॥


---

आगी लागो त्यांच्या तोंडा ॥ काय शिवणें त्या लंडा ॥ ३ ॥
तुका म्हणे घडी पळ ॥ तेथें कैंचा तो गोपाळ ॥ ४ ॥ ६२३३ ॥

शिवाय संस्कृत कवींनीं मद्यपानाचे दुर्गुण सांगितले ते असेः—

चित्ते भ्रांतिर्जायते मद्यपानाद्भ्रांते चित्ते पापचर्यामुपैति ॥
पापं कृत्वा दुर्गतिं यांति मूढास्तस्मान्मद्यं नैव पेयं न पेयं ॥१॥
मत्तो हिनस्ति सर्वं मिथ्या प्रलपति हि विकलया बुद्ध्या ॥
मातरमपि कामयते सावज्ञं मद्यपानमत्तः सन् ॥ २ ॥
एकतश्चतुरो वेदा ब्रह्मचर्यं तथैकतः ॥
एकतः सर्वपापानि मद्यपानं तथैकतः ॥ ३ ॥
वेश्यावेश्मसु सीधुगंधललनावक्त्रासवामोदितै-
र्नीत्वा निर्भरमन्मथोत्सवसुखैरुन्निद्रचंद्राः क्षपाः ॥
सर्वज्ञा इति दीक्षिता इति चिरात्प्राप्ताग्निहोत्रा इति
ब्रह्मज्ञा इति तापसा इति दिवा धूर्तैर्जगद्वंच्यते॥ ३ ॥
"मद्यपस्य कुतः सत्यम्"

१ दारूबाज. २ ऐकून. ३ टाकून. ४ दारूच्या व्यसनास. ५ गंधानाला (ओहोळ). ६ वाईटबुद्धीचा. ७ चांगल्याबुद्धीचा. ८ स्नान. ९ स्वर्गी. १० तारण करणारी मात्रा.



## विजयासेवननिषेध ( गांजा पिणें याचा निषेध ).

( वसंतीं बघुनि मेनकेला ही चाल ).

नका ह्या सेवूं गांजाला ॥
अतितर खडतर दुष्ट व्यसन ही अग्नीची ज्वाला ॥ ध्रुवपद ॥
गांजा निसूनि कुणि मळिती ॥
नंतर मिळवुनि त्यांत तमाखू चिलमीमधिं भरिती ॥
मग तो काथ्या[1] पेटविती ॥
ठेवुनि चिलमीवरी अग्नि मग सट्टा[2] मारिती ॥
तयाचा घोंटा[3] कुणि करिती ॥
भांग, दूध, कांकडीबीज तशिं काळीं मीरीं तीं ॥
घालुनि बदाम त्या भरती ॥
खसखस गोडी येण्यास्तव वर टाकिति साखर ती ॥
घोंटुनी करिति एक काला ॥
जलमिश्रित जो पदार्थ घोंटा असें वदति त्याला ॥ १ ॥ नका० ॥ १ ॥
नुसती भुकटी[4] भांगेची ॥
तिचाहि करिती घोंटा नसतां शक्ति द्रव्याची ॥
यांकुती[5] करिती गांजाची ॥
भक्षियल्या ती स्पष्ट कष्टदा[6] खात्यां[7] बहु जाची ॥

---

१ गांजेकस प्रायः नारळीच्या काथ्याची गुंडी करून ती पेटवून त्या झगझगीत विस्तवानें गांजा पेटवितात. २ दम. ३ घोंटा करितात त्यांत भांगेची भुकटी, दूध, कांकडीचें बीं, काळीं मिरें, बदाम, खसखस, साखर वगैरे घालून तयार करितात. ४ कोणी कोणी भांगेची भुकटी पाण्यांत घोटून पितात, कारण ते गरीब लोक असतात. ५ गांजाचा पदार्थ. ६ कष्ट देणारी. ७ खाणारांस.

किती ते भर्जी खाति ह्याचीं ॥
चैरस, भांग, मौजूम, गोडि त्या बहु गुलकंदाची ॥
तल्लिन वृत्ति बहुत ज्याची ॥
त्यास नसे ती आस आपुल्या त्या घरदाराची ॥
अंमॅलहि फार नये ज्याला ॥
तो बचनागादिकां धोतऱ्यासह सेवी ह्याला ॥ नका ह्या सेवूं० ॥२॥
मळिति ह्या गांजाला जेव्हां ॥
तई तयाच्या करीं येत त्रैलोक्याचा ठेवा ॥
काय मग मनुजांचा केवा ॥
सॅडकीमध्यें गांजेकस तो देइ शिव्या देवा ॥
मृत्युचा गांजा हा ठेवा ॥
यास्तव सारा दूर अशा—ह्या नरकाच्या पेंवा ॥
वेडे फिरति गांवगांवा ॥
नाना चावा करुनि शिव्या—ते देति बापभावा ॥
अशा ह्या गणा शंभॅराला ॥
ह्यांतुनि नव्वद गांजापासुन हा निर्णय झाला ॥ नका० ॥ ३ ॥
कॅत्य हें आहे जोग्यांचें ॥
नाहीं संसारांत लक्ष त्या भंगड लोकांचें ॥
असें हें सेवन विजॅयेचें ॥
काम धाम निर्मुक्त करी त्या शरीर मनुजाचें ॥

---

१ भांगेचा पदार्थ. २ बर्फीसारखा पदार्थ. ३ साखर मिळवून गुलाबाचीं फुलें टाकून एक पदार्थ करितात. ४ गांजाचा अंमल ज्यांस फार येत नाहीं; मग ते त्यांत बचनाग, धोतरा, अफू वगैरे पदार्थ टाकून नंतर तो गांजा पितात; मग त्यांना चांगली तार येते. ५ पाड. ६ तारेमध्यें. ७ शंभर वेड्यांतून नव्वद गांजापासून झालेले असतात. ८ गांजा पिणें हें कृत्य जोगी, गोसावी, बैरागी वगैरे यांचें आहे. ९ भांगेचें.

मळण हें अघटित घटनेचें ॥
गांजेकस करी डाव्या[१] हस्तें तर्पण पितरांचें ॥
रंग हे फिरती ओष्ठांचे ॥
लाज वाटते मुखीं नाम ह्या घेतां भ्रष्टांचें ॥
पिता[२] दे चिलीम तनुजाला ॥
तोही मारी सट्टा नंतर देतो आजाला ॥ नका० ॥ ४ ॥
पेटती[३] गांजेकस वादीं ॥
देति शिव्या ते एकामेकां भरूनियां नादीं ॥
तोडिती ते संबंधादी ॥
बनति जसे ते अदालतींतिल[४] वादी प्रतिवादी ॥
मग तो टाकुनि ती गादी ॥
जायं निघोनी दोंघड़िनें ये बघुनि वेळ नेंगदी ॥
तई ती जमे जशी लुगदी ॥
तशी जमे ती मैत्री ह्यांची ह्या समयीं अगदीं ॥
पूर्वीचा[५] सर्व वाद मिटला ॥
अग्नि ठेवितां त्या चिलमीवर झाला मग सल्ला[६] ॥ नका० ॥५॥
पाचक[७] मूळव्याध नाशी ॥
भूक[८] लागण्यास्तव हा देती गांजा घोड्याशीं ॥

---

१ गांजा मळीत असतां गांजेकस डाव्या हातानें तर्पणासारखें पाणी खालीं टाकितात. २ बाप भंगड असला तर मुलगाही कांहीं दिवसांनीं तीच दीक्षा घेतो, मग काय विचारावें ! बाप मुलास, मूल आजास अशी ती चिलीम देत असतात. ३ गांजेकसांचे वाद झाले तर पुनः ते गांजाचे बैठकींत आल्यावर जशी ती गांजाची लुगदी जमते तसा तसा ह्यांचा वाद मिटून स्नेह जमतो. ४ कोर्टांतील. ५ रोकडीची ( चिलमीची. ) ६ मिलाफ ( एकोपा ). ७ गांजा पाचक व मूळव्याधीचा नाशक आहे, पण अति झाल्यावर फार वाईट आहे. ८ घोडा जर चारा न खाऊं लागला तर त्यास भूक लागण्याकरितां गांजा देतात.

शिवाची वुट्टी ही खाशी[1] ॥
जाशिल कैलासाला[2] जरि तूं नेमें ही खाशी ॥
असे हे वदती लोकांशीं ॥
गांजेकस जो त्यास ठाव तो अंतीं श्रीकाशी ॥
ऐकतां हर्ष न सुजनाशीं ॥
काय बोध हा ह्मणति करावा अशा भंगडाशीं ॥
पडतो शरिरावर घाला ॥
या विजयेचें[3] सेवन घातक फारच मनुजाला ॥
नका ह्या सेवूं गांजाला ॥
अतितर खडतर दुष्ट व्यसन ही अग्नीची ज्वाला ॥ ६ ॥
डोकें[4] फारचि भणभणतें ॥
प्रथम ओढितां ह्या गांजाला नाकहि गेणगणतें[5] ॥
भोंवळ[6] त्यास फार येते ॥
ज्ञानतंतुला इजा होउनी मनुष्य बडबडतें ॥
भान[7] त्या मनुजाचें जातें ॥
तारेमध्यें गुंग होउनी शरीरही सुकतें[8] ॥
शेवटीं प्राणाला मुकतें ॥
यास्तव गांजा भांग याकुती त्यागा घोंट्यातें ॥
मनुज जो गांजेकस झाला ॥
संसारांतुनि मुकला चुकला ईशपदाब्जाला[9] ॥
नका ह्या सेवूं गांजाला ॥ अतितर० ॥ ७ ॥
अपव्यय होतो काळाचा[10] ॥
गंजड भंगड असे पाहुणा स्पष्टचि कालाचा[11] ॥

---

१ गांजेकस वदतात कीं, गांजा ही शंकराची वुट्टी आहे. २ शंकराजवळ किंवा मसणांत. ३ भांगेचें. ४ गांजेकसाच्या डोक्यांत भणभण असें अक्षय होतें. ५ पडसें आल्यासारखें होतें. ६ गिरकी. ७ स्मरण. ८ वाळून जातें. ९ ईश्वराच्या चरणकमलास. १० वेळेचा. ११ मृत्यूचा.

मेंदू बिघडे बहु त्याचा ॥
होतो प्रादुर्भाव झडकरी मुलांवरी ह्याचा ॥
मनुज तो क्लीब होय साचा ॥
विजयासेवन हा क्रम ज्याचा बहुतां दिवसांचा ॥
द्वेष बहु होतो अन्नाचा ॥
त्यास सांगतां काम वाचितो फाडा नन्नाचा ॥
जो ह्या गांजाला भ्याला ॥
निर्व्यसनी त्या चरणीं ठेविन सतत मस्तकाला ॥ नका ह्या० ॥८॥
होतसे वायु उन्मत्त ॥
भ्रंश पावतें त्या मनुजाचें गांजानें चित्त ॥
जवळचें संपतसे वित्त ॥
सदा भडकलें असें वाटतें त्याचें हें पित्त ॥
शेवटीं बसे गीत गात ॥
म्हणे काय हें वदन दाखवूं सगळ्यां लोकांत ॥
अशी ही गांजाची मात ॥
सांगतसे ह्या सर्व जनाला पारख बळवंत ॥
करा ह्या नामी काजाला ॥
स्मरा सदोदित आपण ईश्वरचरणपंकजाला ॥
नका ह्या सेवूं गांजाला ॥
अतितर खडतर दुष्ट व्यसन ही अग्नीची ज्वाला ॥ ९ ॥

---

१ मुलें जर गांजा पिऊं लागलीं तर त्यांजवर हा परिणाम फार लवकर होतो. २ जो मनुष्य पुष्कळ दिवस गांजा पितो तो नपुंसक होतो. ३ अन्नद्वेष. ४ उन्मत्तवायु होतो. ५ बुद्धिभ्रंश होतो. ६ गांजेकसाचें पित्त अक्षय भडकलेलें असतें. ७ रडत. ८ गांजाची कथा. ९ ईश्वराच्या चरणाचें स्मरण हें उत्तम काम तें करा.


# अफूच्या दुर्व्यसनाचा निषेध.

**( लक्ष्मी गर्वें निंदा बोलुनि झिडकारिति पार्वती. ही चाल ).**

अफीण खाउनि नरजन्माची करूं नका माती ॥
क्रूर घातकी अफीण शेवटिं येइ न कामा ती ॥ ध्रु० ॥
अफूस भक्षण करण्याचे हे चार[1] भेद असती ॥
कसेंहि सेवन करोत ते पण झिंगलेले[2] दिसती ॥
कोणि करूनि गोळी[3] स्वकरें मुखांत टाकीती ॥
कोणि कुसुंबा[4] बनवुनि तीचा मुखांत ओतीती ॥
बाभळिचा हा पाला मिळवुनि मदत[5]हि बनवीती ॥
ओढिति त्याला ठेवुनि मध्यें अंतर तीन[6] विती ॥
कोणि अफूचा अर्क काढुनी त्यातें शिजवीती ॥
चंडोलाच्या[7] गोळ्या करुनि छिट्टे[8] त्या वदती ॥
दौत चिनीची नळी लावुनी सळईला धरिती ॥
खोबरेल तेलाची लाविति तेथें ती बत्ती ॥
गोळि ठेविती त्या दौतीच्या ते छिद्रावरती ॥
निजती खालीं करून अपुल्या त्या तंगड्या वरती ॥
धरूनि तोंडीं नळी तियेतें झटकन ओढीती ॥
अंमल अंगीं संचरल्यावर उठूनियां बसती ॥

---

१ चार प्रकारांनीं अफूचें सेवन करितात. २ शुद्धिबुद्धिरहित. ३ अफूची गोळी खातात किंवा नागीण करून घशांत सोडतात. ४ अफूच्या पाण्याचा पदार्थ. ५ मदत ही बाभळीचा पाला व अफू यांची करितात. ६ तीन वितीच्या अंतरानें ओढितात. ७ चंडोल हा अफूच्या अर्काचा अमली पदार्थ असतो त्याला ओढण्याला चिनीमातीची दौत, नळी, खोबरेलाचा दिवा वगैरे सामान लागतें. ८ चंडोलाच्या गोळ्यांस त्याचे भजक छिट्टे हें नांव देतात.



सां[1] गोळ्यांचा पत्ता त्याला एक अणा देती ॥
तीन अण्यांपावेतों कोणी गोळ्या चढवीती ॥
इतक्यावरि अंमल नचि येतां मग तो मेळ[2] घेती ॥
तो ओढुनियां मग ते वदती अली निशा पुरती ॥
खमंग[3] अंमल उठला त्यापरि निशाहि गरगरती[4] ॥
ऐसा झाला अंमल पुढची ऐकावी रीति ॥ १ ॥
यापरि आला अंमल झाले डोळे आरक्त ॥
तोंड कोरडें ठोक[5] जिभेला ते कांटे येत ॥
मग तो ओलें तोंड कराया उपाय योजीत ॥
पाव अण्याचा ऊंस[6] आणुनी बसे त्यास खात ॥
नसे जाहली तृप्ति उंसानें बर्फी[7] मागवित ॥
एक अण्याचा अंमल यापरि पावलि हारवित ॥
मग ती येई पिनक[8] अंगीं घरीं जाय झुकत ॥
दिवसदिवसही त्याचें मुख तें सदा जाय सुकत[9] ॥
व्यापाऱ्याचा मुलगा परि तो होतो ऋणयुक्त[10] ॥
धन मालावरी मजा मारिति दुसरे ते धूर्त ॥

---

१ चंडोलाच्या गोळ्या ( छिट्टे ) सहा झाले ह्मणजे त्याला पत्ता हें नांव देतात. २ चंडोल ओढण्याच्या नळींतील मळ ओढितात. त्यायोगें तद्घडी अंमल येतो ३ खरपूस अंमल झाला. ४ भरपूर निशा आली. ५ चंडोल, अफू, मदत ह्या अंमलांपासून तोंड कोरडें पडून जिभेस कांटे येतात. ६ चंडोल ओढल्यावर तोंड कोरडें होतें तें ओलें करावयास ऊंस आणून खातात. ७ उंसानें तृप्ति न झाल्यावर बर्फी, जिलबी वगैरे खातात. ८ अफू, चंडोलादिकांच्या तारेस पिन्नक ह्मणतात. ९ प्रेतासारखें अफीमबाजाचें तोंड दिसतें. १० हें व्यसन अंगीं पूर्णपणें जडल्यावर मग व्यापारी असो अथवा राजा असो त्याची दुर्दशाच !!!

चंडोलांचे[१] कर्ते पूर्वी फुकट पाजितात ॥
अंगीं जडल्यावरि हें झेंगट धना मागतात ॥
धनवानहि[२] तो प्रथम पाहुनी त्यास गोंवितात ॥
देउनि हातीं गूळ खोबरें चटक लावितात ॥
प्रथम ओढितां ह्या चंडोला वमन[३] त्यास होत ॥
नको ओढुं मज वमनद्वारें पित्यास[४] सुचवीत ॥
परंतु प्राशक पेटुनि हट्टा पुन्हा तेथ जात ॥
चैटइ[५] चुस्यांवरि लोळुनि घोळुनि निशावाज होत ॥
निशा उतरतां पिशाच्च[६]यवत तो आफीण्या बनत ॥
घरसंसारहि काम पहाया नसेचि त्या बनत[७] ॥
हाय हाय बहु करुन घरामधिं रडते रामा[८] ती ॥
वस्त्राभरणासाठीं आणिल कोठुनि दामा[९] ती ॥ २ ॥
चंडोलातें सेवुनि गिरक्या घेत घरीं आला ॥
निजस्त्रियेशीं[१०] त्या तारेमधिं तो वदता झाला ॥
भूक लागली मला फार गे घाल खावयाला ॥
दुग्धशर्करा[११]मिश्रित करुनी हातशेवयांला ॥

---

१ चंडोल बनविणारे आखाडेवाले प्रथम श्रीमंताचा मुलगा पाहून त्याला फुकट चंडोल पाजितात व त्याला चंडोलाच्या आखाड्यांत या अण्णासाहेब, या तात्यासाहेब, अशीं श्रीमंतीचीं विशेषणें देतात, व तोच चांगला बनून गेला ह्मणजे मागें त्यास ह्मणतात तो अण्ण्या आला होता ह्याप्रमाणें त्याची अब्रू समजतात. २ धनवानाशिवाय चंडोलवाला कसा टिकेल? ३ चंडोल ओढणारास प्रथम ओकाऱ्या होतात. ४ ह्यावरून पिणारास चंडोल सूचना देतो कीं तूं मला पिऊं नको. ५ चंडोलाच्या अखाड्यांत अशी घाण असते कीं, सांगतां पुरवत नाहीं. उंसाच्या चुस्या, मिठाईचे कागद, चंडोलाचा काळा कुट्ट राखुंडा असा असून खुशाल चांगले लोक तेथें गाढवासारखे लोळतांना मीं प्रत्यक्ष पाहिले आहेत. ६ भुतासारखा. ७ वेळ फावत नाहीं. ८ स्त्री. ९ पैसा. १० स्वस्त्रीशीं बोलला. ११ साखर, दूध, हातशेवया खाऊं घाल.

किंवा देई मजला संक्रांतीच्या[1] हलव्याला ॥
माझ्या पोटामध्यें झाला सखे फार कोला[2] ॥
तेव्हां कांता वदली नाहीं दूध तान्हुल्या मुला ॥
तुम्हांसाठिं मी आणूं कोठुनि सांगा हें मजला ॥
असें ऐकतां त्या अफिण्याचा तिळपापड झाला ॥
उभा राहिला उठुन करामधिं घेउनि काठीला ॥
ऐकत नाहिंस माझी आज्ञा ह्मणुन मारि तिजला ॥
तान्हें लेंकरुं फेंकुनि दिधलें नसे भान त्याला ॥
लोक वदति कां दूर झोंकिलें तान्ह्या बाळाला ॥
असति सदोदित अशा आपदा अफीणबाजाला ॥
मारामारीवांचुनि[3] त्याचा दिवस जरी टळला ॥
तरि तें मोठें भाग्य तयाचें असे गमे मजला ॥
अफू कुसुंबा मदत ओढितां ह्यापरि चंडोला ॥
काय लाभ हा प्राप्त होत त्या मानवचांडाला[4] ॥
ह्या अमलापासून भंगतो[5] मानवही[6] अंतीं ॥
स्त्रीसुत बांधव ह्यांस लावितो करावया खंती[7] ॥ ३ ॥
ह्या देशांतिल आया[8] देती अफू तान्हुल्या मुला ॥
ह्मणति कशीतरि झोंप यावी ह्या तान्ह्यारामूला ॥
परि ह्या आफूपासुनि होतो अवष्टंभ त्याला ॥
अज्ञानानें कसें कळेना त्याच्या आईला ॥

---

१ संक्रांतीचा हलवा दे. २ फार कालवलें. ३ अफिणे, चंडोले ह्यांच्या मारामाऱ्या घरांत दररोज व्हावयाच्या. ह्याचें कारण हा निरुद्योगी बनतो व गोड खाण्यास पहातो तें दररोज गरीब बायकोनें कोठून आणावें बरें? पण 'हे गांवचे गांडे व बायकोचे देशपांडे' ह्याप्रमाणें त्या गरीब स्त्रीवर ह्यांची अक्षय मोंगलाई चालते!!! ४ मनुष्यरूप चांडाळास. ५ नाश पावतो. ६ मनुष्य. ७ शेवटीं आई, बाप, बायको, मुलें, बंध्वादिकांस शोक करायाला लावितो. ८ माता, बहुधा ह्या देशांत मुलें जन्मल्यावर दुसऱ्या दिवसापासून तान्ह्या मुलांस अफू देतात.

आंकडि[1] होउनि मुलें मरति किति येइ जिवीं घाला ॥
ह्मणूनि न कधीं निजपुत्राच्या मुखीं अफू घाला ॥
अधिक अफू ती मुलांस होउनि मुकती प्राणाला ॥
कितीक जागीं असे दाखले दाखवुं लोकांला ॥
विषें[2] पुत्रातें देउनि ह्मणवी आई अपणाला ॥
मसणखाइसम ही तरि आई असें गमे मजला ॥
चीन देश ह्या अफूपासुनी हीनबुद्धि झाला ॥
जपान देशानेंही केला त्याजवरी हल्ला ॥
ह्मणूनि देऊं नका अफू ही अपुल्या बाळाला ॥
हटकुन आग्रह करुनि धाडितां मूळचि काळाला[3] ॥
मरतां पुत्रचि दोष ठेवितां अपुल्या भाळाला[4] ॥
ह्मणुनि मुलांचा स्पर्श नको ह्या अगिच्या जाळाला ॥
अन्य[5] देशचीं मुलें न खाती जरि ह्या आफूला ॥
तरी न्यूनता कोठें दिसते त्यांच्या शक्तीला ॥
कशी दडपितां ह्या आफूनें बाळांची छाती ॥
अफू बाळकां थोरां मारी बोळवुनी शक्ती ॥ ४ ॥
नाश[6] फार ह्या अफूपासुनी होतो देहाचा ॥
देइ जांभया[7] ताठ भोंवया[8] बसते ती वाचा[9] ॥

---

१ आंकडी वगैरे विकारांची जननी ही अफूच. २ प्रत्यक्ष आई होऊन तीच जर पोटच्या मुलास अफूसारखें विष देते, तर त्या आईस मसणखाई ह्मणणें बरें वाटतें. ३ मृत्यूला. ४ कपाळाला. ( नशीब शब्द उच्चारतांना कपाळावर हात ठेवून ती जागा दाखवितात. ) ५ हिंदुस्थानाशिवाय व हिंदुस्थानांतही पारशी, यहुदी वगैरे लोक आपल्या मुलांस अफूचा अंमल देत नाहींत ह्मणून त्यांची शक्ति कमी तर दिसत नाहींच पण कांकणभर आह्मांपेक्षां जास्त दिसते. ६ बारा वर्षें चंडोलाचें सेवन करून तो अजीबात सोडून दिला अशा आमच्या एका मित्रानें ह्या अफूचे दुर्गुण सांगितले कीं, हिच्या योगानें देहाचा सुतराम् नाश होतो. ७ चंडोलाची, अफूची संवई असलेल्या मनुष्यास ती न मिळाली तर तो जांभया देतो. ८ भोंवया ताठ होतात. ९ बोलवत नाहीं.

होत असे तो [1]अवष्टंभ त्या फारचि शौचाचा ॥
पोटामध्यें [2]दाह होत त्या [3]बिघाड रक्ताचा ॥
[4]मुखीं नासिकीं पाणी चाले [5]शिंकतसे साचा ॥
[6]पोटऱ्यांस ते येति पेटके खुपति जशा कांचा ॥
[7]वांत्या होती [8]कंबर दुखते [9]धरी गळा त्याचा ॥
पुरुषत्वाची [10]हांनि होतसे स्रावहि [11]रक्ताचा ॥
ह्या अमलामधिं गोड इच्छि तो तूपाचा चमचा ॥
नंतर उठती पाठीवर त्या धनकोच्या [12]कमचा ॥
गोड खावया खर्च जाहला सगळ्या पैक्याचा ॥
लुगडीं चोळ्या आणि धोतरें त्या पागोट्याचा ॥
पन्नासांचा पीत पितांबर होता जो उंचा ॥
गहाण ठेवी तो पांचावरें[13] ह्यांत अर्थ [14]कंचाँ ॥
देव्हाऱ्यांतिल देव विकुनियां त्यांचा तो कुंचा ॥
विकूनि केला सगळा [15]फडशा त्या घरदाराचा ॥
ह्यास्तव सोडा नाद तुह्मी ह्या मलीन व्यसनाचा ॥
भक्ति करुनियां ईशपदाची [16]तद्वारीं नाचा ॥
बलवंताची मान्य करा ही आपण विज्ञप्ति ॥
दुर्व्यसनातें त्यागुनि ठेवा गुरुचरणीं भक्ति ॥ ४ ॥

---

१ शौचास न होणें. २ पोटांत दाह होतो. ३ रक्त विघडतें. ४ नाकांतून तोंडांतून पाणी चालतें. ५ शिंका येतात. ६ पोटऱ्यांस पेटके येतात. ७ ओकाऱ्या होतात. ८ कंबर दुखते. ९ गिळवत नाहीं. १० नपुंसकत्व येतें. ११ रक्तस्राव परसाकडच्या मलद्वारे होतो. १२ सावकाराचे कोरडे पाठीवर उडतात. १३ चंडोल, अफू, दारू, गांजा इत्याद्यनेकव्यसनग्रस्त एक नरपशु मीं पाहिला. त्यानें तराजूनें मोहरा एका शेटजींस दिल्या. तसेच कित्येक ४०० रुपये किंमतीचे शेले चाळीस चाळीस रुपयांवर गहाण टाकिले. हें आह्मीं दृष्टीनें पाहिलें आहे. १४ कशाचा. १५ निकाल. १६ ह्या दुष्ट व्यसनाचा नाद सोडून श्रीपरमेश्वराची भक्ति करून त्याच्या द्वाराशीं नाचा.

# परस्त्रीगमननिषेधपर पद.
# स्त्रीची पतीस विनंति.

( भला जन्म हा तुला लाधला ही चाल. )

प्रेमें हितकर[1] मम विज्ञप्ति[2] मान्य करा प्रियकरा[3] ॥
जोडितें तुह्मांस दोन्ही करां[4] ॥ ध्रु० ॥
परनारीचा संग नका करुं मूर्तिमंत[5] ही सुरी ॥
मारुनी घेतां कांहो उरीं ॥
महामारिसम परनारीविष झोंबे जइं अंतरीं ॥
तइं तो पुरुष घाबरा करी ॥
वरिवरि दिसते रम्य तुह्मां ती अंतरिं असि[6] कातरी ॥
अफूच्या पुष्पासम साजिरी[7] ॥
॥ चाल ॥ यासाठिं तियेची सोडा दुस्संगती[8] ॥
संगतीपासुनी अनेक जन भंगती ॥
ह्या वेडामध्यें बुद्धि होय गुंग ती ॥
॥ चा० प० ॥ सुवर्णकलशासम[9] मी तुमची दासी टाकुनि घरा ॥
करीं कां घेतां फुटकां करा[10] ॥ प्रेमें० ॥ १ ॥
प्रियपति तुमची कांता मी तरि असूनि बहु लाडकी ॥
तुह्मीं ती ठेवियली द्वाड कीं ॥
रांड घाणें[11] तिस नसे वाण हो शरिरानें मोडकी ॥
असुनियां तुम्हां गमे गोड कीं ॥

---

१ हिताची. २ विनंति. ३ प्रिया. ४ करांस. ५ प्रत्यक्ष. ६ तरवार. ७ शोभिवंत. ८ वाईट संगती. ९ सोन्याच्या भांड्यासारखी. १० मातीचें फुटलेलें मडकें. ११ सडलेला खतेरा.



त्यागुनि तुह्मी मजसम ऐशी संसारा जोडे[1] कीं ॥
तशीनें मिळेल काय जोडेकीं[2] ॥
॥ चाल ॥ ती नेत हिरावुनी पुरुषाचें रूप तें ॥
हें कसें कळेना तुह्मां अहो मम पते? ॥
मी तुमच्या विरहें सर्व रात्र तळपतें[3] ॥
॥ चा० प० ॥ कित्ता ठेवा कांहिं बरा तो बंधु, मुलां, लेंकरां ॥
विनंती तुह्मी मान्य ही करा ॥ प्रे० ॥ २ ॥
विषवल्लीसम[4] जाणा आपण परक्याची कामिनी[5] ॥
नका कधिं बघूं दिसायामिनी[6] ॥
लग्नाची मी कांता तुमची पहा गृहस्वामिनी[7] ॥
सदोदित असें मनोगामिनी[8] ॥
ऐसें असतां परनारी ही विषजननी[9] सर्पिणी ॥
तियेची आवड तुमच्या मनीं ॥
॥ चा० ॥ तुह्मि करितां परकीवरी प्रेम तें जसें ॥
परपुरुषें[10] मजशीं प्रेम केलिया तसें ॥
वाटेल आपुल्या दुःख अंतरीं कसें?
॥ चा० प० ॥ विचार ऐसा आपण अपुल्या ठायीं आतां करा ॥
सोइचा मार्ग धरा तरि जरा ॥ प्रे० ॥ ३ ॥
ही विषवल्ली[11] हात पाय इस अग्रासम भासती ॥
भुजा ह्या डाहाळ्या दीसती ॥

---

१ जोडणारी. २ नफा. ३ पति परद्वारीं गेल्यावर मागें स्त्री फारच चळपळते ही गोष्ट प्रसिद्धच आहे. ४ विषाची वेल. ५ दुसऱ्याची स्त्री. ६ दिवसारात्रीं. ७ घराची मालकीण. ८ मनाप्रमाणें चालणारी. ९ विषाची आई. १० तुह्मी जारपुरुष बनून जसे दुसऱ्याच्या स्त्रीकडे जातां तसा परपुरुष जर मजकडे आला तर कसें? ११ परस्त्री विषवल्ली; हात, पाय ह्या वल्लीचीं अग्रें; भुजा ह्या डहाळ्या; नेत्र नासिकादि इंद्रियें पुष्पें; हीं पाहून—

चक्षुरादि इंद्रियें फुलांसम हिच्या ठायिं शोभती ॥
सकामी नर भ्रमर[1] लोभती ॥
दीपासम परकांता[2] कामी पतंग मज वाटती ॥
बळें हे प्राण तिला अर्पिती ॥
॥ चा० ॥ किंवा हा जाणा कालरूप[3] धीवर ॥
स्त्रीजाल पसरि ह्या प्रपंचोदधीवर ॥
त्यामाजिं मच्छ हे पडती कामी नर ॥
॥ चा० प० ॥ यासाठीं सुविचार करुनियां आपण मागें सरा ॥
धरुनियां सद्गुरुचा आसरा ॥ प्रे० ॥ ४ ॥
परनारीच्या संगें झाले नष्ट किती ते जन ॥
वदति त्या भुजंगांस[4] दुर्जन ॥
श्रीसीतेला हात लावितां लंकेचा रावण ॥
काळें[5] हा करी तया भक्षण ॥
तैसा विराटशालक कीचक[6] यास करुनि बंधन ॥
तयाचें भीम करी चंदन ॥
॥ चा० ॥ शाप हा गौतमें दिधला इंद्राप्रती[7] ॥
चंद्रास लागला कलंक हा निश्चितीं ॥
यासाठीं त्यागा परनारीसंगती ॥
॥ चा० प० ॥ बहुत पाप हें परनारीच्या संगें घडतें नरा ॥
नका ह्या स्पर्शू[8] दुर्धर गरा ॥ प्रेमें० ॥ ५ ॥

---

१ कामी नर हे भ्रमरासारखे ह्या विषवल्लीवर उड्या टाकितात. २ परस्त्री ही दीपप्रकाशासारखी व कामी पुरुष पतंगासारखे. ३ काल हाच कोणी धीवर असून त्या धीवरानें हें परस्त्रीरूप जाळें प्रपंचसमुद्रावर टाकिलें आहे त्यांत कामी पुरुष हे माशांसारखे फसतात. ४ जारांस. ५ यम. ६ कीचकास नुसता द्रौपदीस स्पर्श केल्याबद्दल भीमानें ठार केलें. ७ इंद्रास सहस्र भगें पडलीं. ८ महाविषास.

रम्य[1] मुखाची गौरवर्णही मूर्तिमंत यक्षिणी[2] ॥
नरांच्या प्राणातें भक्षिणी[3] ॥
सतेज मौक्तिकहार तुह्मां ते ठार करिति ह्या क्षणीं ॥
नका ही पाहूं अवलक्षणी[4] ॥
गोंडस कर ह्या सुंदर नेत्रां बघूनियां ईक्षणीं[5] ॥
गमो ही तुह्मां घुबड पक्षिणी[6] ॥
॥ चा० ॥ ही कितीहि असली रूपानें सुंदरी ॥
तरि समजा हीतें रानांतिल वानरी[7] ॥
त्यागूनि परस्त्री सुख घ्या निजमंदिरीं ॥
॥ चा० प० ॥ यापरता[8] मज दुजा सुचेना मार्ग सुखाचा बरा ॥
धरा हा वांटिन मग शर्करा प्रे० ॥ ६ ॥
परनारीचा संग नरातें सत्य पाडितो फशीं ॥
जशी ती वृश्चिक[9] भरली उशी ॥
जाउनि तिचिया गृहीं पकडलें तुह्मांस जरि त्या निशीं[10] ॥
कोण मग तुमच्या ह्या पाठिशीं ॥
'कणिक तिंबिती जशा बायका' तुह्मांस शिक्षा तशी ॥
केलिया दुःखचि मम मानसीं ॥
॥ चाल ॥ यास्तव त्या जाऊं नका परकिया गृहीं ॥
कां व्यर्थ व्यर्थ हो पडतां ह्या आग्रहीं ॥
प्राशितां रुईचा चीक मानुनी दहीं ॥

---

१ रमणीय तोंडाची. २ एक पिशाचयोनि. ३ भक्षण करणारी. ४ अपशकुनी. ५ नेत्रांनीं. ६ घुबडीसारखी. ७ परस्त्री कितीही सुस्वरूप असली तरी परपुरुषानें वानरीसारखीच ती समजावी. ८ वेगळा. ९ विंचवांनीं भरलेली उशी त्याचप्रमाणें परस्त्री. १० रात्रीच्या समयास.

॥ चा० प० ॥ शत्रु आपले तुमच्या वरतीं दांत खाति करकरा ॥
म्हणुनि ह्या कुमतीतें हांकरा[1] ॥ प्रे० ॥ ७ ॥
जारजारिणी ह्यांची अब्रू जगांत कवडीसम[2] ॥
तयांचा मालक अंतीं यम ॥
यास्तव सोडा निंद्य जगीं हा अतितर दुष्ट क्रम[3] ॥
दिसतसे कालरात्रिचा तमं[4] ॥
ईशपदातें सदा स्मरुनियां अंतरांत शम[5] दम ॥
ठेविल्या पावे सर्वोत्तम ॥
॥ चाल ॥ परनारीपासुनि कीर्तिनाश ह्या जनीं ॥
परलोकनाशही जाणा आपण मनीं ॥
दो लोकिं होतसे नर नरकाचा धनी[6] ॥
॥ चाल प० ॥ म्हणुनि विनवितें स्मरा स्मरा त्या दीनवत्सला वरा ॥
भरंवसा माझ्या वचनीं धरा ॥ प्रेमें हितकर० ॥ ८ ॥
प्रिये तुझीं हीं वचनमौक्तिकें[7] कर्णशुक्तिकापुटीं[8] ॥
पडुनि मी झालों बहु हिंपुटी[9] ॥
अधिकारानें तूं मजपेक्षां वयमानें धाकुटी ॥
उतरिशी कशि बोधाची भेटी[10] ॥
ह्या व्यसनाच्या पायीं माझी दुखावली अति कंटी[11] ॥
बैसली मला बरी ही चेटी[12] ॥

---

१ हांकून लावा. २ कवडीसारखी. ३ वाईट मार्ग. ४ अंधार. ५ कामक्रोधादिकांपासून पराङ्मुख पावलेली जी अंतःकरणाची स्थिति तो शम. ६ मालक. ७ वचनें हींच मोत्यें. ८ कर्णरूप शिंपल्यांत. ९ कष्टी झालों. कारण मार वगैरे खाऊन पश्चात्ताप झाला म्हणून. १० भट्टी. ११ कंबर दुखवली. कारण व्यभिचारसमुद्राच्या वादळांत रात्रीं ह्याचें शरीरजहाज पालथें उलथें करून खूप कुमललें त्यायोगें कंबर दुखावली. १२ चट्टी.

॥ चाल ॥ हे स्त्रिये तुझ्याविण ज्या ज्या दुसऱ्या स्त्रिया ॥
॥ धाकट्या थोरल्या माझ्या बहिणी अयाˡ ॥
॥ त्यागूनि कोप तो ठेव मजवरी दया ॥
॥ चा० प० ॥ सेविन यावरि सखे सदोदित भवतारक ईश्वरा ॥
॥ असे तच्चरणˡ हि बलवच्छिराˡ ॥ ९ ॥

... ग्रंथालय ... नं.

---

१ धाकट्या ज्या त्या बहिणी व थोरल्या त्या आईसारख्या. २ त्याचे पाय. ३ बळवंताच्या डोक्यावर अर्थात् बळीच्याही डोक्यावर ईश्वराचे पाय असल्याचें पुराणप्रसिद्ध आहे.


# वेश्यागमननिषेध.

**( गुणिजना अणावी मना माझि प्रार्थना एक ऐकावी ) ही चाल.**

हे वेश्यागमनी जना ऐक प्रार्थना ह्यांत अर्थ[1] ना तुला तो कांहीं ॥
वांछुनियां वेश्यासंग होशि निस्संग जगामधिं पाही ॥ ध्रुवपद ॥
जो मानव रंडीबाज तया ये माज जनांची लाज कांहिं त्या नाहीं ॥
त्रासुनियां आईबाप ह्मणति हें पाप मरुन कधिं जाई ॥
ही वेश्या आहे कशी करी चौकशी समजुनी अशी मनामधिं घेई ॥
जशि मसणवटींतिल[2] घटी तशी ही नटी त्याज्य[3] समजावी ॥
वरि वरि करी चटिपटी दिसे धाकुटी नरांतें लुटि आपुल्यापायीं ॥
ही घरबुडवी तरि खॅरी जाण अंतरीं करुनि चतुराई ॥
ही मदनाची दीपिका करी रंग फिका नराला ठकावया हो खाई ॥
कामी हे जाळिति धनरूप इंधन करुनि त्या ठायीं ॥
ही एका वाली भूल दुज्या दे हूल तिज्याला चूल ह्मणे फुंकावी ॥
प्रत्यक्ष नराला भुली सुरी काबुली मनीं उमजावी ॥
जो वेश्याव्यसनीं पडे शरीरें सडे शेवटीं रडे करुनियां आई ॥
मग ह्मणे ईश्वरा शरण त्वरित हें मरण मला तूं देई ॥ हे वेश्या० ॥१॥
ज्याजवळ असे बहु वित्त त्यावरी चित्त ठेविते सक्त अशी ही रंडी ॥
यजमान रक्तपीतिचा[10] हिला प्रीतिचा गमे तो लंडी[11] ॥

---

१ अर्थ नाहीं. २ मसणांतील मडकें ( वेश्या स्मशानघटिका इव वर्जनीया. ) ३ त्याग करावयास योग्य. ४ गाढवी. ५ दिवटी. ६ अग्नि पेटविलेली खळी. ७ कामी पुरुष आपल्या धनाचें व रूपाचें सर्पण करून हिच्यांत जाळितात. ८ देखतभूल. ९ काबुल देशांतील सुरी मोठी तेजदार व जहरी असते, त्याप्रमाणें ही वेश्या वर दिसायाला सुंदर पण अत्यंत जहरी आहे. १० धनवान् मनुष्य ह्या वेश्यांच्या नादीं लागला मग त्यास रक्तपित्त रोग असला तरी ह्या त्याला पैशाकरितां चहातात. ११ नामर्द.



धनवान[1] जरी तो अंध नष्टमणिबंध[2] गळालें स्कंध नसे ज्या शेंडी[3]॥
तरि त्यावरि दावी प्रीत अशी विपरीत नरकमय हंडी[4] ॥
ही कापट्याची खाण नराला जाण करी अज्ञान ठोकुनी मांडी ॥
ह्या मूर्खा दावुनि गाल हरी धन माल सुवस्त्रें भांडीं ॥
ही नरा लुटाया सज्ज बहुत निर्लज्ज सर्वथा त्याज्य ह्मणुनि इस सोंडीं[5]॥
कां अब्रुला मळविशी रांड अळविशी[6] विषाची कांडी ॥
स्वस्त्रीसि वाहिली आण विवाहीं[7] जाण गेलिया प्राण तुला नचि सोडीं ॥
विसरोनी गेला श्वान आपुला मान धरुनि ही खोडी ॥
ही कुलटा वेश्या रांड हिला तूं सांड नको तूं सांड[8] होउं या ठायीं[9] ॥
ह्या उपदेशाचें जरा चीज करिं नरा धरुनियां सोई[10] ॥ हे वेश्यागमनी ०२
हे रंडीच्या पोषका[11] तिच्या तोषका नसति दोष कां? तुझ्या ह्या कार्या ॥
करुनियां मनीं सुविचार करीं संचार बघुनि निजभार्या[12] ॥
निजभार्यारूपी सरा[13] त्यजुनिआं खरा घाणिचा करा सेविशी वायां ॥
ही देइल करिं नरवटी रांड शेवटीं बसेल तुज खाया ॥
स्वस्त्री ही जशी मानस[14] तुझें मानस[15] शुभ्र जो हंस रमो ह्या ठाया ॥
हें त्यागुनि होशी काग[16] धरिशि अनुराग[17] मांस[18] भक्षाया ॥
निजपत्नी जैशी सुधा[19] हिजवरी वुधा भागवीं क्षुधा सुधारीं काया ॥
ही पत्नी टाकुनि नरा प्राशिशी सुरा[20] कलीची छाया ॥

---

१ थोंटा. २ खांद्यापासून तुटलेल्या हाताचा. ३ डोक्याची शेंडी नष्ट झालेली. सारांश हाच कीं यजमान द्रव्यवान असला मग तो कसाही असो तो ह्या रांडांस मानवतो ! ! ४ विष्ठेची घागर. ५ टाकून दे. ६ आपलीशी करितोस. ७ लग्नांत स्त्रियेबरोबर केलेली शपथ धर्म, अर्थ, काम यांत तुला अंतर देणार नाहीं, ती ह्या भुलभुलावणीच्या गरक्यांत सांपडल्यामुळें विसरला. ८ माजलेला पोळ. ९ सार्थक. १० सोयसुमार धर. ११ पोषण करणाऱ्या. १२ आपली स्त्री. १३ सरोवरा. १४ राजहंसाचें वसतिस्थान. १५ अंतःकरण हाच हंस. १६ कावळा. १७ प्रीति. १८ वेश्यारूपी मांस. १९ अमृत. २० सुरारूप रांड.

संबंध जिचा तुज फार तुझ्यावर भार सर्व संसार जिचा तव ठाया ॥
त्याग हा तिचा करुं नको व्यर्थ भकुं नको आडमार्गी या ॥
साधुच्या दर्शना चुका भाषणा मुका अशी श्रीतुका[1] देतसे ग्वाही ॥
रंडिला भेटण्यास्तव घालिसी कव वेष्टुनी बाही ॥ हे वेश्यागमनी०॥३॥
जो वेश्यागमनी नर तिचा चाकर मानवी खेर[2] स्पष्ट समजावा ॥
निजवधू स्वरूपसुंदरी तिशीं कीं घरी उभा तो दावा ॥
वेश्याहि वदे त्याजशीं अणावी ठुशी पैठणी मसीं चोरुनी भावा ॥
हा अणुनि देई तिशीं सख्या बंधुशीं करुनियां कावा[3] ॥

---

१ श्रीतुकाराममहाराजांनीं ह्या वेश्यागमनी लोकांवर पुष्कळ अभंग केले त्यांतील:—

साधूच्या दर्शना लाजसी गव्हारा ॥
वेश्येचिये घरा पुष्पें नेशी ॥ १ ॥
वेश्या दासी मुरळी जगाची वोंवळी ॥
ते तुज सोंवळी वाटे कैशी ॥ २ ॥
तुका ह्मणे आतां लाज धरिं बुच्या ॥
टांचराच्या कुच्या मारा वेगीं ॥ ३ ॥ ५७८० ॥
देउळासी जातां लाजसी गव्हारा ॥
दासीचिया घरा पुष्पें नेशी ॥ १ ॥
संतासी देखोनी होसी पाठमोरा ॥
दासीचिया पोरा दाम देशी ॥ २ ॥
संत मागे पाणी नेदी एक चूळ ॥
दासीची अंगोळ सारी पाणी ॥ ३ ॥
संतासी देखोनी करितो टवाळ्या ॥
दासीचिया चोळ्या धूतो भावें ॥ ४ ॥
तुका ह्मणे त्याच्या थुंका तोंडावरी ॥
जातो यमपुरी भोगावया ॥ ५ ॥

२ मनुष्यरूपी गाढव. ३ कपट.

तिशिं बाळ्याबुगड्या घडी [१]धनवटी घडी शाल [२]चौघडी भक्षण्या [३]मावा ॥
घरचिनें सुतार्डी वांड आडवा दांड भरुन नेसावा ॥
वेश्येचें अद्भुत तेज गादिवर शेज घेउनी मेज पलंग करवावा ॥
स्वस्त्रीस मिळेना खाटें असा बोभाट जगामधिं व्हावा ॥
वेश्येला बसवी रथीं होय सारथी नेतसे [६]तीर्थं पूजवी देवा ॥
स्वस्त्रिनें त्यजुनियां सँदन करूनी रुदन गवर वेंचावा ॥
जोंवरी धनाचा ऊत अंग मजबूत तोंवरी भूत होउनी जाई ॥
नाठवती आईबाप आडवें पाप तयाला येई ॥ हे वेश्या० ॥ ४ ॥
वेश्येस मिळे जंव धन तंववरी मन ठेविते पूर्ण बनुनियां शांत ॥
यजमान रडे ही रडे नयन कोरडे करुनि आकांत ॥
यजमान हंसे ही हंसे बसे ही बसे असे हे ठसे उठति लोकांत ॥
तो निर्धन होतां [१०]धनी ह्मणे एथुनी जाइ मसणांत ॥
हे तिचे शब्द ऐकून होय त्या मरण ह्मणे मी शरण सखे तुज येत ॥
ती मारी त्याला लात मुखावरि हातचापट्या देत ॥

---

१ धनवटी लुगडें. २ शालीच्या चौघडीनें त्या रांडा आपल्या बायकांबरोवर मिरविणारे ब्राह्मण आमच्या नाशकास आहेत; हें तर काय, पण त्यांचीं लुगडीं मोठ्या पहाटीं धुवून आणणारे ब्राह्मण नरपशू एथें आहेत ! ३ आटविलेलें दूध. ४ सूतकांठी वांड दोन रुपयांचा ! ५ बाज, खाटलें. ६ आमच्या नाशकास असे लोक आहेत कीं, ते पांडवलेणीं, त्रिंबक, दुधस्थळीं सीतासरोवर ह्या पवित्र ठिकाणीं त्या त्यांच्या "त्वमेवमातापितात्वमेव" मानलेल्या, अपवित्र रांडा तांग्यांत बसवून डौलानें तांगा दौडवितात आणि त्यांच्या बायका त्याच रस्त्यांवर शेण गोवऱ्या वेंचितात हर हर देवा ! अशा स्वस्त्रीचा अपमान करणाऱ्या नराधमांपेक्षां ह्या दुनियेंत दुसरा नीच कोणी नाहीं. ७ घर सोडून दररोज ह्या रंडीबाज नवऱ्याचें मढें पेटविण्याकरितां त्या गरीब विचारीस शेण गोंवऱ्या आणाव्या लागतात. ८ धन जवळ आहे तोंपर्यंत रंडी फार शांतपणानें वागते. ९ यजमान थोडा रडला कीं, ही मायावी रंडी त्याच्या दसपट त्याकरितां रडते. भर्तृहरि ह्मणतात कीं "एता हसंति च रुदंति च वित्तहेतोः". १० यजमान धनवानाचा निर्धन झाल्यावर मग तीच मायावी रांड ह्मणते, मेला मसणांत कां जाईना !!!

ह्या तिचा पहातां भेद मनामधिं खेद येत त्या स्वेदं[1] ताप अंगांत ॥
ह्मणतसे फसवलें व्यर्थ जाउनी अर्थ करुनि संगात ॥
जे वेश्यागमनी पुरे खाति खेटरें[2][3] कुणी नातरे अशा फंदांत ॥
होवोत थोर श्रीमंत करी तत्[4]अंत यमाजीपंत ॥
हें व्यसन नव्हे रे नीट फार वाईट येउंदे वीट करुनियां घाई ॥
किति नासुनि गेलीं मुलें भंगलीं[5] कुलें रंडिच्या पायीं ॥ हे वेश्या०॥९॥
हें व्यसन बहुत स[6]डघाण खंडितें[7] मा[8]न शेवटीं प्राण हरी [8]समयाला ॥
त्या गाधिजमुनि[9]चें भान नुरवुनि श्वान करुनियां नेला ॥
विपिनांत ऋषि श्रीश्रृंग[10] तपाचा भंग होउनी दंग मनीं तो झाला ॥
ह्या वेश्यादर्शनबळें सुमति ती चळे [11]तपीं ये घाला ॥
बंधु ते सुंद [12]उपसुंद प्रीतिचा बंद तोडुनी धुंद होति युद्धाला ॥
त्या तिलोत्तमेचें रूप पाहतां खूप भूलले त्याला ॥
विष्णुच्या मोहिनीरुपा बघुनि ये हुं[13]पा विसरला तपा मत्त जाहाला ॥
तो भस्मासुर दुर्मति जाळि त्यास ती नसुनियां ज्वा[14]ळा ॥
जो धरी रंडिचे चरण नसे त्या तरण ह्मणुनि जा शरण लोकनाथा[15]ला ॥
येउंद्या हृदयिं [16]अनुताप करा दुरि पाप धरा शांतीला ॥

---

१ घाम. २ वेश्यागमनी नरपशू कित्येक वेळेस तिच्या हातून, कित्येक वेळेस तिच्या दुसऱ्या यजमानाच्या हातून खेटरांचा मार खातात. ३ प्रसिद्ध साधु शिवदिनकेशरी ह्यांनीं ह्मटलें आहे:—"शिवदिन केशरिप्यारे ॥ कामिकु पैजार रंडी मारे ॥ रंडी दुर करना दुर करना ॥ ध्यान गुरूका धरना" ॥ ४ त्याचा शेवट. ५ कित्येक कुळें रंडीच्या योगानें ठार बुडालीं आहेत. ६ सडलेल्या घाणीसारखें दुर्गंधयुक्त. ७ मानखंडना करविणारें. ८ वेळेवर प्राणहानि करणारें. ९ विश्वामित्रास अप्सरांनीं कुत्रा करून इंद्रसभेंत नेलें होतें. १० श्रृंगऋषीच्या तपाचा भंग ह्या गलांडऋषींनीं केला. ११ तपाचे ठायीं. १२ सुंदोपसुंद आपसांत लढून तिलोत्तमेच्या रूपास भुलून प्राणास मुकले. १३ उत्सुकतेस. १४ विष्णूनें भस्मासुरास मोहिनीरूप घेऊन भस्म केलें ती मोहिनी कांहीं विस्तवाची ज्वाला नव्हती. १५ ईश्वरास. १६ हृदयांत हें जें वाईट व्यसन जडलें ह्याचा पश्चात्ताप करा.

जो शुकाचार्य मुनि शांत पढे वेदांत तयाचा अंत घ्यावया येई ॥
वेश्येस ह्मणे तो माय ह्मणुनि ते पाय[1] असावे डोई ॥ हे वेश्या० ॥६॥
संयोगजेंन्य[2] हा रोग होय जइं भोग शरीरीं आग फार हो त्याला ॥
परम्याचें पिळूं बेंद[3] गरमि खदखंद[4] आणि अंगाला ॥
गरमीचे येती चटे शरीरहि फुटे ह्मणे नायटे स्नेहिमित्राला[5] ॥
वस्त्रावरि दिसतां डाग सांगणें भाग अलें नशिबाला ॥
वदतसे रंडि भोंवली लांव[6] चावली गर्मि फूटली दिसे शरिराला ॥
लघवींतुन येते तार रक्त पू फार तिडिकही ज्याला ॥
गर्मिचें येइ झेंगट[7] अंग पिंगट घेउनि घुंगट[8] दडे कोन्याला ॥
नचि खाइ हिंग[9] तें तिखट तसें हें मीठ वांगिं वालाला ॥
यापरी पथ्य तें करि तूपभाकरी उदकही केरीं[10] करी पानाला ॥
ह्मणतसे वाढला चटा तूटला खटा बेटा[11] अब्रूला ॥
तासूनि बोरें[12] बाभूळ अम्र जांभूळ आणुनी साल तिला उकळावी ॥
गुळणीहि करावी तिची किती अनितिची कथा सांगावी ॥ हे० ॥७॥
खातसे अन्न अळवणी[13] ह्मणे भुलवणी[14] डसे सर्पिणी[15] मर्मि माझीया ॥
अंग तें जशी चाळणी[16] तोंडटाळणी[17] करी भेटाया ॥

---

१ श्रीशुकाचार्यमुनि संसारबंधापासून मोकळे होऊन अरण्यांत गेले. तेथें तपश्चर्या करीत असतां इंद्राच्या अप्सरा प्रतिज्ञा करून त्यांना जिंकण्यास आल्या; तेव्हां शुकाचार्यांनीं त्यांना आई ह्मटल्यावर, त्या अप्सरा हतवीर्य होऊन शुकाचार्यांस शरण आल्या. अशा त्या निस्सीम ब्रह्मवेत्त्याचे पाय आपल्या शिरावर असावे. २ वाईट स्त्रियांच्या संगापासून होणारा रोग. ३ जांघेंत बेंड होतें तें. ४ फारच खाज. ५ एखाद्यास उपदंशविकार झाला तर तो नायटे वगैरे झाले असें मित्रमंडळीस सांगतो. ६ एक दुष्ट स्त्रीजाति. ७ कचाट. ८ बुरखा. ९ मीठ, मिरची, हिंग, वांगीं, वाल हें कुपथ्य. १० उपदंश झालेल्या मनुष्यास बहुतकरून पाणी पिण्यास जें देतात तें मातीच्या करच्यांत देतात. ११ कीर्तिला कलंक. १२ गर्मीच्या रोगानें रोग्याचें तोंड येतें तेव्हां बोर, बाभूळ, अंबा, जांभूळ, बकुल वगैरे झाडांच्या साली उकळून त्या पाण्याच्या गुळण्या करितात. १३ आळणी, बिनमिठाचें. १४ भुलविणारी. १५ सर्पीण चावे. १६ सर्वांगास भोंकें पडून चाळणीसारखें अंग होतें. १७ कोणी भेटायास आल्यावर न भेटणें.

डोळे ते होती [1]लाल सूजले [2]भोल वाटती हाल मुखें सांगाया ॥
सर्वांगीं निचरे[3] जल असुनि सोज्वल नासली काया ॥
येतसे वहुत त्या भोंड नासलें तोंड तिखट तें बोंड मागतो खाया ॥
होइना कांहिं हलचाल झोडितो [6]गाल आपुले वायां ॥
सन्[7]मित्रमनीं हुरहूर बसति ते दूर अंतरीं चूर होति त्या ठाया ॥
तो निंबाची डाहळी घेइ तळमळी वारि माशा या ॥
त्याजवळ बसे ती [9]मांय पुशी ती [10]वांय करी हयहाय तशी ती [11]जाया ॥
लाविती मलम अंगास घालिती घांस करुनियां माया ॥
यास्तव हें [12]वेश्यागारें त्यजी हा सार तुझ्याशीं फार वदत मी नाहीं ॥
ठेवूनि मनामधिं धाक व्यसन हें टाक नको पडूं [13]मोहीं ॥ हे वेश्या० ८
जाळ तूं असा [14]दुस्संग इंद्रियां [15]भंग फुटुनियां अंग जातसे ह्यानें ॥
लौकिकास चढतो [16]जंग भयंकर [17]फिरंगोपदंशानें ॥
[18]आंखडती ह्यानें हात पडति ते दांत अशा फंदांत कशाचें खाणें ॥
बधिरत्व येइ कर्णांस हानि वंशास निरंतर होणें ॥

---

१ आरक्त. २ कपाळ. ३ पाणी वहाणें. ४ तेजस्वी असून शरीर नासतें. ५ नुसती भाकर व तूप खाऊन तोंड फार बिघडतें मग तो रोगी बोंडें वगैरे मागतो. ६ कोणी कांहीं मागितलेलें खावयास न दिल्यावर रोगी तोंड झोडितो. ७ चांगल्या मित्रांच्या मनीं. ८ कडूनिंबाचा डहाळा. ९ आई. १० जखमा (गर्मीच्या). ११ बायको. १२ वेश्येचें घर. १३ वेश्येच्या मोहांत पडूं नको. १४ वाईट संग. १५ इंद्रियांचा नाश. १६ कीट (मलीनता). १७ फिरंगोपदंश (फिरंगी वगैरे परद्वीपस्थांच्या संसर्गापासून एक अनिवार उपदंशाचा प्रादुर्भाव आपल्या देशांत फैलावला आहे; तो अतिशय भयंकर असून त्यास इकडच्या नामांकित वैद्यांनीं फिरंगोपदंश हें विशेषण दिलें आहे.) नाहींपेक्षां आपल्या आर्यवैद्यकांत ह्या उपदंशाची इतकी कडक तऱ्हा नव्हती; पण ही गोऱ्या रंगाची कथली गर्मी आमच्या देशांत फैलावल्यापासून हिच्या योगानें हजारों कुळें आजपर्यंत बुडालीं आहेत ! ! ! १८ हात आंखडतात, दांत पडतात, कानांनीं ऐकूं येत नाहीं व निरंतर वंशाची हानि होते.

पाठीला येतें [1]पोंक टाळुला भोंक वचनही रोख वदे गेंगाणें ॥
ह्या उपदंशाची तऱ्हा कथूं किती नरा गाउनी गाणें ॥
हा [2]रोगें तापला तवा मुलां नातवां जाळि पणतवां देउनी ठाणें ॥
यास्तव हा सोडी छंद रंडिचा फंद तिच्या घरिं जाणें ॥
ही [3]पैत्रावळ उच्छिष्ट नराला कष्ट देतसे स्पष्ट घेउनी [4]नाणें ॥
रंडिच्या नादिं लागून व्यर्थ [5]भागून फिरशि [6]अडरानें ॥
[7]पारा हा अंगीं फुटे घाण बहु सुटे मस्तकहि उठे न बोला सोई ॥
खाउनियां रसकापूर दुःख भरपूर शरीरीं होई ॥ हे वेश्यागमनी० ९
[8]कैदिलों कोठडी दुजी तशी यास जी निजस्त्री त्यजी विषारीसंगा ॥
अंगावरि येउनि फोड नासिकीं मोड जिरविती इंगा ॥
[9]मक्षिका उडति भणभण खाति ढेंकुण पिसा चणचण तोडिती अंगा ॥
पुरुषत्व जाय सोडून मूत्र कोंडून पावतो भंगा ॥
वैद्यानें [10]दिधल्या पुड्या ओढि गुरगुड्या ह्मणे मग रड्या पाव श्रीरंगा॥
गेलि माझि सर्व दुर्मति होय सन्मति त्यजुनि ह्या ढंगा ॥


---

१ पाठीला कुबड येतें, टाळूला भोंक पडतें, बोलणें गेंगाणें बोलतो. २ हा रोग स्वतः मुलांस, नातवांस, पणतवांस असा पिढ्यानपिढ्या जाळतो असें वैद्यमत आहे. ३ वेश्या ही उष्ट्या पत्रावळीपेक्षांही अत्यंत नीच आहे, कारण पत्रावळीवर एकदां एक जेवला ह्मणजे ती उष्टी होते आणि ह्या वेश्यारूप पत्रावळीचा हजारों लोकांनीं अनुभव घेतलेला असतो. ४ द्रव्य. ५ शिणून. ६ आडरानांतून. ७ ह्या उपदंशाच्या रोगांत पारा, रसकापूर इत्यादि विषारी औषधें अडाणी वैद्य देतात. त्यांपासून रोग्याच्या सर्वांगांतून तो पारा फुटून तोंडाची स्थिति नारळाच्या करवंटीसारखी (नुसतीं नाकातोंडाचीं भोंकें दिसतात) अशी होते. ८ ज्याप्रमाणें कैदीलोकांना वेगळी कोठडी त्याचप्रमाणें ह्या रोग्यास वेगळी कोठडी असून ह्याच्या संगास स्वस्त्रीही त्यजिते. ९ माशा उडतात, ढेंकूण, पिसा अंगास तडतडां तोडितात, पुरुषत्व नाहींसें होतें, मूत्र कोंडतें. १० वैद्यानें उत्तम पुड्या दिल्यावर मग हा रड्या ईश्वराचें स्मरण करितो व ह्मणतो माझी दुष्टबुद्धि जाऊन हे ढंग सोडून दिले.

ह्या दुःखाच्या[1] समयांत झिजवुनि हात करी आकांत बघुनि मज गंगा ॥
माय ही सती पार्वती तशी मम सती निजस्त्री गंगा ॥
जीस[2] म्यां दिली गळसरी कुठें ती खरी घातकी पुरी रांड निस्संगा ॥
सोडूनि व्यसन हें दिलें दावि पाउलें मला भवभंगा ॥
जे रंडिबाज[3] नर जंत तयां बलवंत जोडुनी हात पद्य हें गाई ॥
नुमजल्या[4] तुह्मी ना अर्थ गेलि ही व्यर्थ कागदीं शाई ॥ हे वे० ॥१०॥

---

१ अशा महद्दुःखांत माझी आई पार्वतीबाई व माझी स्त्री गंगा ह्या दोघीच काय त्या माझ्या उपयोगीं पडल्या असें तो रोगी ह्मणाला. २ जिला म्यां गळसरी दिली ती गाढव कोठें आहे? हरहर देवा! घातकी रांड निःसंग.!!! ईश्वरा! मीं हें दुर्व्यसन सोडलें आतां तुझीं पाउलें मला दाखीव. ३ जे रंडिबाज मानवस्वरूपाचे जंत, त्यांना हात जोडून हें पद्य गातों. ४ तुह्मी न समजल्यावर कांहीं अर्थ नाहीं व हें पद्य लिहिण्याकरितां खर्चिलेली शाई व्यर्थ गेली असें मी समजतों.



# जुगाराचा निषेध.

**( दो दिवसांची तनु ही साची सुरतरसाची करुन मजा ) ही चाल.**

दुष्ट जुगारा दूर झुगारा[1] अग्नि अंगारा[2] लावुं नका ॥
दुष्कीर्तीचा जगा नगारा वाजवूनियां दावुं नका ॥ ध्रुवपद ॥
जुगार[3] जुव्वा नक्की दुव्वा आणि बाजुवा फांशांच्या ॥
बिझीक पत्ते लुटिती कुत्ते गिर्द्या मूलक नाशाच्या ॥
फांसेगिर्दा नकटेजर्दा खेळ ह्मणति हा मर्दांचा ॥
सुंदर बंदर बित्तू ढिगली खेळ नसे हा कामाचा ॥
व्याधि रूपही बाधी आधीं रमतां वाटे गोड मनीं ॥
परंतु जेव्हां नेते टक्का तेव्हां फिक्का मनुज जनीं ॥
बिलीयर्ड ते बोर्ड लावुनी खेळति आर्डर घेऊनी ॥
घोड्यांच्या कुणि शर्ती करती पुष्कळ पैसा लावूनी ॥
दावुनि भप्का सोडतिचा हा गप्का देती पाठिवरी ॥
सट्टा आणी नरास बट्टा अन्योन्यांच्या अटींवरी ॥
पक्षी[4] कुतरीं झुंजवूनियां पैजा लाविति ह्या खेळीं ॥
कवडीपासुनि लक्षावधि त्या रुपयांची होते होळी ॥

---

१ फेंकून द्या. २ घराला. ३ जुगाराचे प्रकार जुव्वा, नक्कीदुव्वा, फांशांचा, बिझीक, पत्ते, गिर्द्या, फांसेगिर्दा, नकटेजर्दा, ( फुटक्या कवडीनें खेळण्याचा ) सुंदर, बंदर, बित्तू, ढिगली, ( गंजीफांचा ढीग. ) बांधीचा, बिलीयार्ड ( चेंडूचा ) घोड्यांच्या शर्तीचा, सोडती, सट्टा. ४ पक्षी ( कोंबडीं वगैरे ) आणि कुत्र्यांना झुंजवून पैजा लावितात, हाही जुगाराचाच प्रकार आहे, चक्काचा, फिरकीचा, पांवसाचा सट्टा, पलंगावर नानाप्रकारचे जिन्नस ठेवून बांगड्या टाकवितात तो, ) ह्या वरच्या सर्व खेळांच्या नांवांची व्याख्या केल्यास अंगरख्यापेक्षां खिसाच लांब होईल ह्मणजे एकेका नांवाचीं दोन दोन पानें होतील; यास्तव नुसता नामनिर्देशच केला आहे. ह्याजबद्दल रसिक वाचकांची मी क्षमा मागतों.

चक्रें फिरकी आणी गिरकी शेवटिं नरकीं ती ढकली ॥
जुगार जेथें तिथें हरघडी उभ्या असति त्या गाढ कली ॥
पर्जन्याचा सट्टा मोडी खट्टा पाजी लोकांचा ॥
प्रारंभाला गोड परी तो अंतीं दाता शोकाचा ॥
पलंग मांडी त्यावरि भांडीं हरजिनसांतें ठेवीती ॥
पावअण्यावरि दोन बांगड्या लोखंडाच्या टाकविती ॥
सळइमधें जरि पडे बांगडी मग त्या जिन्नस मिळे फुका ॥
चुकल्यावरि ती चवलि पावली हरवुनि जातो घरीं मुका ॥ १ ॥
दुष्ट जुगारा दूर झुगारा० ॥ १ ॥
जुगार होतो ज्या ज्या जागीं तिजला ह्मणती आखाडा[1] ॥
नव्हे अखाडा नरा बुडाया प्रत्यक्षचि तो हा खाडा[2] ॥
अथवा दुसरें नाम देति हें जुगारजागेला अड्डा[3] ॥
मूर्तिमंत हे नर गाडाया मला भासतो तो खड्डा[4] ॥
मानव[5] जुगार खेळायाला आधीं होतो बहु वेडा ॥
मग[6] तो पडतो त्याच्या पायीं अपायकारक हा खोडा ॥
ईर्षा[7] वाढुनि खेळामध्यें मनास लागे बहु ओढा ॥
मग ते वदती अटल जुगारी दादा[8] थोडी विडि ओढा ॥
कंठि[9] चौकडा कडींहि हरतो हरतो पायांतिल तोडा ॥
हट्टा पेट्टुनि मग तो हरवी उत्तम जो धोतरजोडा ॥

---

१ जुगाराचा अखाडा. २ खळगा. ३ जुगाराचा अड्डा. ४ अपवित्र खांच. ५ मनुष्य आधीं मोठ्या उत्सुकतेनें जुगाराच्या आखाड्यांत जातो. ६ मग त्याच्या पायांत अपायकारक बेडी पडते. ७ ह्या खेळांत ईर्षा हें मुख्य तत्व आहे. ८ जुगाराच्या नादीं पेटल्यावर मग त्या मनुष्यास मुळींच भान राहत नाहीं. त्यांत अमलाची चिलीम द्या किंवा विडी द्या कांहीं कळत नाहीं. ९ ह्या खेळांत एका माणसानें एके दिवशीं २२०० रुपयांचे डागडागिने हरविले हें आह्मीं आमच्या नजरेनें पाहिलें. हा माणूस जातीचा उंच असून तो महारवाड्यांत जुगार खेळला. शेवटीं महारांच्या हातची पूजा घेऊन घरीं आला ! ! !

बंडि जाकिटें सद्रे हरला शेवटिं पायांतिल जोडा ॥
पंचावांचुनि सर्व हरुनियां झाला सर्वोपरि उघडा ॥
[1]गडबड करितां अड्ड्यामध्यें मग तो खाई बहु थपडा ॥
मारुनि कोणी लाथा बुक्या करिति उताणा तो [2]उपडा ॥
अशा रीतिनें पैसा गेला एक राहिला जो कपडा ॥
तोहि फाटुनी तीन हतांचा शिल्लक बाकीचा तुकडा ॥
त्या वस्त्रावर दारु ओतुनी ह्मणती त्या बाहिर काढा ॥
दोन जुगारी करीं धरुन त्या दाविति सरकारी वाडा ॥
यापरि गेला पैसा टक्का करिं न राहिला एक रुका ॥
खूप [3]बुकालुन अखेर खटला झाला त्याच्यावरी [4]फुकां ॥ दुष्ट जुगारा ॥२॥

[5]हरलों त्याची गोष्ट कथियली [6]जिंतले त्यांची ऐका [7]तीं ॥
बाराशांचा डाव संपला मग ती रक्कम जमवीती ॥
बाराशांतुन [8]घरभाड्याचे सहज दोनशें ते गेले ॥
हजार रुपये शिलक राहतां तोंच शिपाई देखियले ॥

---

१ जुगारी मनुष्य एकवेळ जुगार खेळण्यास प्रवृत्त झाल्यावर मग तो आपल्या अंगावरील सर्व चीजवस्त हरवितो. असें होतांच मग विशेष गडबड करूं लागतो. पण त्याच्या उलट जे जुगारी असतात ते त्याची ही गडबड पाहतांच त्यास यथा-स्थित फराळाचें घालतात व त्याच्यावर विशेष आरोप येण्याकरितां त्याचा एक ने-सता कपडा राहिलेला त्यावर दारू ओतून हा छाकटा झाला असें ह्मणून त्यास शिपायांचे स्वाधीन करितात; मग पुढें त्या जुगाऱ्याचे सोळा संस्कार होऊन पैशाची, वस्त्रांची, अखेर अब्रूची खराबी होते. २ पालथा. ३ यथास्थित पिटून. ४ व्यर्थ. ५ हरला त्याचे अंगावरचे दागिने व रोख रुपये जाऊन दारू प्याला ह्मणून त्याच्यावर खटला झाला. ६ आणखी तेथें १४ जण जुगारी होते त्यांची काय स्थिति झाली ती ऐका. ७ जुगाराचे अड्डेवाले यांस फार मोठी प्राप्ति असते ह्मणजे आमच्या ह्या नाशकास चार आण्यांचा जुगार खेळले कीं, अर्धा आणा आखाड्याचे मालकाचा असतो, पण मुंबईचा दर फारच भारी असेल. ८ जुगा-राचा शोध ठेवून पकडणारे शिपाई तेथें आले.

सहा शिपायां सा पन्नासांमध्यें गारचि ते केले ॥
सात शतें ती बाकि राहिली हिशोब होउनि या वेळे ॥
तिथें जुगारी चवदा[1] होते त्यांची वांटणि ती झाली ॥
एकेकाला पन्नासांची रक्कम वांट्याला आली ॥
ह्या रुपयांची प्रत्येकानें वाट लाविली ती ऐका ॥
हरामखोरी[2] करुनि मिळविला राहिल कोठुनि तो पैका ! ॥
दारुविक्याच्या पिठ्ठ्यामध्यें[3] चवदा मिळून हे जाती ॥
तेथें झोंकुनि खूप बाटल्या दारू पिऊन तर होती ॥
नंतर त्यांना होई इच्छा वेश्यागमनाची[4] भारी ॥
चाळ बघुनियां त्या रांडांची शिरती तेव्हां घरोघरीं ॥
तिथेंहि झोंकिति खूप[5] दारुला मग ते अपुल्या येति घरीं ॥
झिंगुनि[6] पडती दिवसभरी ते नंतर येती शुद्धिवरी ॥
अशा रीतिनें पन्नासांचा उडविति फन्ना[7] परस्परी ॥
दुसऱ्या दिवशीं धन मिळवाया करणें लागे त्यां चोरी[8] ॥
घरीं सुंदरी कांता रडते नित्य मारिते त्या हांका ॥
अशा रीतिनें जुगारियांच्या धनं[10] लौकीका[11] ये धका ॥ दुष्ट जुगारा ॥ ३ ॥

---

१ एकंदर सातशें राहिलेले चौदा वांटे करून प्रत्येकास पन्नास पन्नास रुपयांप्रमाणें वांटा मिळाला. २ लबाडी, चहाडी, फंद, फितुरी, विश्वासघात, अन्यायानें संपादन केलेला हा जुगाराचा पैसा. ३ जुगारांत पैसा मिळाल्यावर मग दारूचें सेवन करण्याची त्या जुगाऱ्यास इच्छा सहज होते. ४ दारूच्या मागें वेश्यागमन मुख्यच. कारण–"मद्यं चापि तत्र प्रियं च कुरुते वारांगनाभिः सह । वारस्त्रीरतये कुतस्तव धनं द्यूतेन चौर्येण वा" अशी एकेकांची परंपरेनें सांगडच घातली आहे ! ! ५ रंडीच्या घरीं ब्रांडी असल्यावांचून शोभा येत नाहीं. तीही हलकी नाहीं तर पंधरा रुपयांची बाटली ! ६ मद्यप्राशनेंकरून शुद्धिबुद्धिरहित होऊन. ७ नाश. ८ चोरीवांचून दुसऱ्या दिवशीं पैसा कोठून मिळेल व पैशावांचून जुगारी अखाड्यांत कसा येऊं देईल. ९ जुगाऱ्याची बायको जुगारी नवऱ्याच्या नांवानें अक्षय रडते. १० द्रव्यास. ११ अब्रूस.

द्यूत जुगारापासुनि दारा[1] हरवी कन्यापुत्रांना ॥
घरदाराचा नाश होउनी करिती फाल्गुन[2]मंत्रांना ॥
पूर्वयुगीं तो नृप धर्मात्मा नलराया बहु सत्वगुणी ॥
ह्या द्यूतानें नाश पावुनी स्त्रीसह हिंडे वनोवनीं ॥
आदिनाथ तो शंकर भोला पण लावुनियां द्यूत करी ॥
पार्वतिनें त्या हरितां गेला रागें रागें वनांतरीं ॥
श्रीव्यासांनीं धर्मा कथिलें द्यूत नको तूं खेळुं कं[3]दा ॥
खेळशील तर भंगशील बा टाळितांचि ही मर्यादा ॥
खेळलास तर खेळ परंतु लावुं नको तूं कधीं पै[4]णा ॥
विसरुनि धर्मे करितां कर्मे हारविलें त्या सर्व धना ॥
अर्धराज्य तें धर्म गमावी तिथें कमावी[5] अपमान ॥
महाधुरंधर भीम अर्जुनासह खालीं तो करि मान ॥
शस्त्रें वस्त्रें दासी हरवी बंधु नौकरांसह अपणा ॥
हरवी स्वस्त्री श्रीपांचा[6]ळी करवि तिची बहु विटंबना ॥
पुरुषार्थी बांधवांसहित तो नेसुनियां वल्कलां[7]जिना ॥
धनास मुकुनी वनास गेला त्यागितांच ह्या गुरुवचना ॥
ह्या योगें तो द्वेष पेटला मिळति परस्पर कंद[8]नाला ॥
अठरा अक्षौहिणी लोक ते जाति यमाच्या सदना[9]ला ॥
द्यूत करी मा[10]नवां भूत हे यास्तव ह्यातें तुह्मि टाका ॥
"जुव्वेबाजी मत कर यारो" तुह्मां सांगतो श्रीए[11]का ॥ दुष्ट जुगा० ॥४॥

---

१ द्यूत, जुगार वगैरेंवर हल्लीं सुद्धां बायकांचा पण लावितात ! २ शिमग्यांतला मंत्र ( बोंबा ). ३ कधीं. ४ पण लावून खेळूं नको. ५ सभेंत धर्म, भीम, अर्जुनादि बांधव ह्यांचा फारच अपमान झालेला जगविश्रुत आहे. ६ द्रौपदीची विटंबना दुःशासनानें केली. ७ पांडव वनवासास गेले तेव्हां वल्कलें वेढून गेले. ८ युद्धास. ९ यमाच्या घरीं. १० मनुष्यांस द्यूत हें प्रत्यक्ष भूत करितें. ११ श्रीएकनाथमहाराज पैठणचे महासाधु ह्यांनीं ह्या दुर्व्यसनांच्या संबंधीं एक पद केलें तें:—

'हऱ्यो[1] जुगारी रंम्ये[2] बमणो' ही गुर्जरमधिं असे ह्मणी ॥
'दूज्यो मूरख रम्ये जुंव्वो[3]' हेंही त्यामधिं कथिति गुणी ॥
नका खेळुं या दुष्ट जुगारा ठाव पगारा[4] ना ठेवी ॥
जुगार बुडवी नरास अडवी[5] शिलक ठेवि ना घर पडवी ॥
ईर्षा[6] चढवी नरास चिडवी[7] घरा बिघडवी हा व्यसनी ॥
घागर गडवी सर्व गमावी स्त्रियेस बनवी केरसुणी[8] ॥
चोर, जार, छाकटे, भामटे, ह्यांचा[9] कोठें हो अड्डा ॥
प्रश्न केलिया कोणी त्याचें उत्तर जुगार आखाडा ॥
दारूबाजा देती न्यायी एका मासाची[10] शिक्षा ॥
देति जुगाऱ्यां सा महिन्यांची यांचा दारूवर नक्षा ॥

---

**॥ बंदे हुशार रहेना बे ॥ साहेब राजी रखना बे ॥**

**गांजा दारू मत पी यारो अक्कल गुंग होती ॥ अपने पल्लवका दाम खरचकर मुखमें मखिया जाती ॥ बंदे हुशार रहेना बे० ॥ १ ॥**

**जुव्वेबाजी मत कर यारो अक्कल गुंग होती ॥ अपने पल्लवका दाम खरचकर शिरपर जुतिया पडती ॥ बंदे हुशा० ॥ २ ॥**

**रंडीबाजी मत कर यारो अक्कल गुंग होती ॥ अपने पल्लवका दाम खरचकर हातमें चवरी आती ॥ बंदे हुशार० ॥ ३ ॥**

**एका जनार्दनका बंदा अक्कल तुजकूं देता ॥ दिल चाहे सो शिकले प्यारे नहि तो ज्या गू खाता ॥ बंदे हुशार० ॥ ४ ॥**

१ हरलेला जुगारी दुप्पट खेळतो. २ गुजराथी भाषेत. ३ दुसरा मूर्ख जुव्वा खेळतो. ४ नौकरलोक जे जुगार खेळतात त्यांच्या पगाराचा ठिकाण लागत नाहीं. ५ मनुष्यास अडवितो. ६ ह्या खेळांत ईर्षा जशी जागृत असते तशी दुसऱ्या खेळांत नाहीं. ७ मनुष्याचें एकामागून एक ह्या खेळांत नुकसान होऊं लागतांच तो चिडतो. ८ बायकोचे डागडागिणे, लुगडीं, चोळ्या जुगारांत हरवून जुगारी हा बायकोस केरसुणीसारखी करून ठेवितो. ९ चोर, जार, भामटे, छाकटे कोठें असतात ? उत्तर जुगाराच्या आखाड्यांत. १० दारू पिणारास पराकाष्ठा एक महिन्याची शिक्षा असते पण जुगाऱ्यास सहा महिन्यांची शिक्षा व शिवाय दंड !

ह्मास्तव त्यागा[१] जुगार जुव्वा वीटे[२] तयांचा येऊं द्या ॥
निश्चय बळकट करा आज हा नको तुह्मां ती मुदत उद्यां ॥
जेथें होतो जुगार तेथें सर्व व्यसनें उभिं असतीं ॥
दुर्व्यसनांचा जुगार जनिता[३] जननी ह्यांची सुरा[४] सती ॥
रंडीबाजी सखी[५] तयांची चोरी[६] ह्यांची ती दाई ॥
ह्मणूनि टाका दुष्ट व्यसना करूनियां तुह्मि बहु घाई ॥
व्यसनांमध्यें दोन्ही व्यसनें धरा तुह्मी तीं स्वच्छंदें ॥
ईश्वरचिंतन विद्याव्यसनीं करा पूर्णता आनंदें ॥
सद्व्यसनांवांचूनि सर्वथा दुर्व्यसनातें सेवुं नका ॥
खंडूजीसुत बळवंतातें कधींहि रागें भरूं नका ॥ दुष्ट जुगारा० ॥ ९ ॥

---

१ टाकून द्या. २ तिटकारा. ३ जुगार हा दुर्व्यसनांचा बाप. ४ दारू ही दुर्व्यसनांची आई. ५ दुर्व्यसनांची मैत्रीण रंडीबाजी. ६ सर्व दुर्व्यसनांची उपमाता ही चोरी आहे. ७ " व्यसनानि संति शतशो व्यसनद्वयमेव केवलं व्यसनं ॥ विद्याभ्यसनं व्यसनं अथवा परमेशसेवनं व्यसनं ॥ १ ॥"


# दुर्व्यसननिषेध व सद्व्यसनस्वीकार.

(भूपाळीची चाल.)

ऐका व्यसनस्थिति ॥ जगाची ॥ ऐका व्यसन स्थिति ॥
दुर्व्यसनांनीं फार बिघडली सांप्रतकाळीं क्षिती[1] ॥ ध्रुवपद ॥
नाच्या घरिं ठेविती ॥ कुणी ते ॥ पोऱ्या ॥
नाचवूनियां तया तमाशा लोकांतें दाविती ॥
अडमार्गीं[2] गोंविती ॥ आपणां ॥ अड ॥
अविचारानें पैसा अब्रू ह्या छंदीं खोंविती[3] ॥
मुसळ घरीं रोंविती ॥ असें हें ॥ मु० ॥
कन्या, कांता, भगिनी, माता यायोगें बिघडती ॥
चाल ॥ द्रव्य तें बहुत नाशिती ॥
वस्तांद[4] जगीं ह्मणविती ॥ बीभत्स[5] शब्द बोलती ॥
मिळवणी ॥ यास्तव सोडा नाच्या पोऱ्या धरावि सत्संगती ॥ ऐका० ॥१॥
विनती सेवकजनां[6] ॥ सर्व ह्या वि० ॥
नियमित[7] पगार घेउनि आपण करा सुधन अर्जना[8] ॥
लांच[9] घ्यावया कुणा— ॥ पासुनी लां० ॥
उद्युक्त[10] न व्हा तुह्मांस विनयें आहे ही प्रार्थना ॥
लांचेमधिं अर्थ[11] ना ॥ जरा तो लां० ॥
लांच[12] चोरि ह्या सख्ख्या बहिणी भासति ह्या सज्जनां ॥

---

१ पृथ्वी. २ वाईट मार्गांत. ३ नाशितात. ४ नाच्या जो ठेवितो व त्यास शिकवितो त्यास वस्ताद किंवा शाहीर असें ह्मणतात. ५ अपवित्र. ६ सेवक. (चाकर नोकर लोकांना) ७ नेमलेला जो तो. ८ द्रव्य मिळविणें. ९ नेमलेल्या पगाराशिवाय लोकांपासून जो पैसा घेतात तो लांच किंवा भाड. १० तयार. ११ अर्थ नाहीं. १२ लांच घेणारा अमलदार किंवा हरएक नोकर ह्यांत व चोरांत तिळमात्र अंतर नाहीं; ह्मणून लांच व चोरी ह्या सख्ख्या बहिणी.



चाल ॥ न्यायानें मिळवा धना ॥
मग यांत कांहिं बाध ना[1] ॥ तुह्मि करा अशा साधना ॥
मिळ०॥ अन्यायें धन मिळवित असतां घात जाहले किती ॥ ऐका० ॥२॥
चोरीपासुनि वुडे ॥ मनुज हा ॥ चो० ॥
न्याय होउनी पाय शृंखळेमध्यें[2] त्याचा पडे ॥
जुलुमें धन रोकडें ॥ मिळविती जु० ॥
रस्तेलूटहि कितिक करिति ते मनुजरूप[3] बोकडे ॥
फारचि हे वांकडे ॥ मनानें फा० ॥
घरफोडे ते कारागारीं[4] वाहतात लांकडें ॥
चाल ॥ घालितात किति दरवडे ॥
कृत्य त्यां कसें परवडे[5] ॥ हें व्यसन फार वावडें ॥
मिळ० ॥ यास्तव माना तृप्ति सदोदित कष्टार्जित[6] वित्तीं[7] ॥ ऐका० ॥३॥
तुह्मां दिली जरि भुरू[8] ॥ कुणीही तु० ॥
तरी चाळिशीपुढें नका हो पुनर्लग्न[9] तें करूं ॥
शरीर हें झिरुंमिरू[10] ॥ होत तई ॥ श० ॥
काय तुह्माला अर्थ असें हें गोंवुनि गळिं लेंकरूं[11] ॥
तुह्मां घातलें मरूं ॥ जरेनें तुह्मां० ॥
व्यर्थ जाइ हा त्या तरुणीचा तारुण्याचा भरू[12] ॥
चाल ॥ सांगती तुह्मां सद्गुरु ॥
तच्चरणिं[13] वृत्ति द्या मुरूं ॥ गुरुचरण हाच सुरतरू[14] ॥
मिळ० ॥ या व्यसनातें त्यागा ऐशी तुह्मांस मम विनती ॥ ऐका० ॥४॥
विधवा ठेविति नर ॥ स्वकामीं[15] वि० ॥
नव्हति नरचि ते मला भासती कुंभाराचे खर ॥

---

१ बाध नाहीं. २ बेडीमध्यें. ३ मनुष्यरूपी बोकड. ४ तुरुंगांत. ५ पुरवतें. ६ कष्टानें मिळविलेलें. ७ पैशावर. ८ चिथावणी. ९ दुसरें लग्न. १० शिथिल. ११ लहान मुलगी. १२ तरुणपणाचा भर. १३ त्या गुरुचरणीं तुमची वृत्ति मुरूं द्या. १४ कल्पवृक्ष. १५ आपल्या कामेच्छेस्तव.

अपलौकिक दुर्धर ॥ तयांचा अ० ॥
द्रव्याशेनें विधवायौवनधना होति तस्कर ॥
दृष्टि परस्त्रीवर ॥ कुणाची दृ० ॥
स्वस्त्री त्यजिती दुष्ट, भंगिती परक्याचें तें घर ॥
चा० ॥ त्याज्य हें व्यसन दुष्कर ॥
वाटते तूर्त भरभर ॥ परि अंतीं बुडतो नर ॥
मिळ० ॥ ह्यास्तव सोडा ह्या दुर्व्यसना ही मम विज्ञप्ति ॥ ऐका० ॥५॥
खोटी तोलूं नका ॥ तराजू खो० ॥
गहाण ठेविति त्यांची वस्तू कधींहि बुडवूं नका ॥
जगास भुलवूं नका ॥ व्यर्थ ह्या० ॥
मनांत भलतें जनांत भलतें कधीं दाखवूं नका ॥
लुच्चांमधिं शिरूं नका ॥ कधींहि लु० ॥
अप्रासंगिक भाषण लोकीं केव्हांही करूं नका ॥
चाल ॥ लग्नांत नाच करूं नका ॥
द्रव्य कां गमवितां फुका ॥ द्यूत हें कधीं रमुं नका ॥
मिळवणी ॥ हितकर भाषण कोणाचेंही ठेवावें चित्तीं ॥ ऐका० ॥ ६ ॥

---

१ विधवांशीं स्नेह ठेवणारे मूर्ख कोणी कामेच्छेनें व कोणी त्यांच्या जवळच्या द्रव्याकरितां तो ठेवितात. २ परस्त्रीगमनी लोक परक्याची स्त्री काढून नेतात व स्वस्त्रीस विलाप करीत बसवितात. ३ फार वाईट. ४ सध्यां (जेव्हां ह्या छंदांत असतात तेव्हां मोठी भरभराटी असते.) ५ कोणाचें गहाण असल्यास तें बुडवूं नये. ६ मनांत एक व जनांत एक असें कधींही दाखवूं नये. ७ अप्रासंगिक प्रसंग न पहातां बहकण्यासारखें बोलूं नका. ८ लग्नांत जो धर्म करणें तो योग्य करावा. पण नाच करवून वेश्येचे हावभाव आपल्या कुटुंबांतल्या माणसांस दाखविणें हें फार लाजिरवाणें काम आहे ! ! ९ खेळूं नका. १० कोणाचेंही हितकारक भाषण ऐकावें, कारण “ बालादपि सुभाषितं ग्राह्यं ” ह्या विद्वानोक्तीकडे दृष्टि दिल्यावर मग कोणाचें भाषण ऐकण्यास प्रत्यवाय नाहीं.

स्वधर्म सोडूं नका ॥ कधींही स्व० ॥
कायिक वाचिक आणि मानसिक सत्या[1] मोडूं नका ॥
शिवीगाळ करुं नका ॥ कुणाशीं शि० ॥
मनांत ईश्वरभीति[2] धरुनियां खोटें बोलूं नका ॥
दुर्व्यसनातें धैका[3]-देउनी ॥ दु० ॥
उद्योगी व्हा आळस टाका सुख ऋण काढूं नका ॥
चा० ॥ भीत जा जगामधिं ठका ॥
सोडूनि तुह्मी चेटकां[4] ॥ मंत्रांस व्यर्थ[5] भुलुं नका ॥
मिळवणी ॥ क्षमा दया[6] ती शांति धरावी आपण परमार्थी ॥ ऐ० ॥७॥
सत्संगतितें धरा ॥ सदोदित स० ॥
ब्रह्मचर्य[7] ठेवून प्रत्यहीं व्यायामातें[8] करा ॥
सत्कर्मे[9] आचरा ॥ जनीं ह्या स० ॥
आयुष्याचा संव्यय[10] करुनी सुबुद्धि द्यावी परा[11] ॥
स्वाभिमान[12] हा तुरा ॥ शिरावरि स्वा० ॥
लावुनि उत्तम कामीं[13] एकी सर्व जनांशीं करा ॥
चा० ॥ लघुबाललग्न[14] ना करा ॥
विद्वान मुलांना करा ॥ जोडितों तुह्माला करां ॥
मिळ० ॥ परोपकारीं रतें[15] व्हा अक्षय त्यजुनि दुष्टसंगती ॥ ऐका० ॥८॥

---

१ खरेपणा हा सर्वस्वीं ठेवावा. २ भय धरून. ३ धक्का. ४ चेटक, मंत्रतंत्रादिक हे केवळ भ्रांतिमय आहेत; त्यांस भुलणें हा वेडेपणा होय. ५ विनाकारण. ६ परमार्थ करून क्षमा, दया, शांति इत्याद्यनेक ईश्वरोपासनेचे मार्ग आहेत त्यांच्या ठायीं प्रीति धरून ते मार्ग स्वीकारावे. ७ ब्रह्मचर्य हें शरीररक्षणास मुख्य साधन, तर तें ठेवा. ८ दररोज व्यायाम करा. ९ चांगलीं कामें आचरण करा. १० आयुष्याचा चांगला उपयोग करा. ११ दुसऱ्यास सुबुद्धि द्या. १२ आपल्या देशाचा अभिमान हाच डोक्यावर तुरा लावा. १३ चांगल्या कामीं एकी करा. १४ लहान मुलांचीं लग्नें करूं नका. १५ प्रीति ठेवणें.

बुद्धिवान[1] रक्षणा ॥ करावें बु० ॥
देउनि त्यांना आश्रय उत्तम तदुपरि सच्छिक्षणा[2] ॥
ठोंब्यांना[3] दक्षिणा ॥ न द्यावी ठों० ॥
विद्वानांतें मान देउनी द्यावें त्यां भक्षणा[4] ॥
तसेंच गोरक्षणा[5] ॥ झटावें त० ॥
कला कुशलता वाढवूनियां माना सुविचक्षणा[6] ॥
चा० ॥ मान द्या राजशासना[7] ॥
चांगली धरा वासना ॥ द्या सुजनां उत्तेजना[8] ॥
मिळ० ॥ शकुन मुहूर्तादिक[9] ह्या ठायीं मानावी भ्रांति ॥ ऐका० ॥९॥
शेतकऱ्यांना करा ॥ साह्यता शे० ॥
वितंडवादी[10] धर्मबाह्य[11] जे ह्यांशीं वाद न करा[12] ॥
स्वदेशि कारागिरां ॥ मदत[13] द्या स्व० ॥
व्यवहारांमधि[14] कुशल राहुनी जनमैत्रीही धरा ॥
दारूबाजा नरा ॥ नका शिवुं दा० ॥
भंगड रंडीबाज जुगाऱ्यांदिकां न द्या आसरा ॥
चा० ॥ दुर्व्यसनेंमार्ग[15] ना बरा ॥
करि जीव बहुत घाबरा ॥ विश्वासघातें[16] नचि करा ॥
मिळ० ॥ आत्मश्लाघा[17], गर्वा न करा सांगुं तुह्मांला[18] किती ॥ ऐ० ॥१०॥

---

१ बुद्धिवान जे त्यांचें रक्षण करा. २ चांगलें शिक्षण द्या. ३ अविद्वान, शंख, मूर्ख यांना. ४ खाण्यास. ५ गाईचें रक्षण करण्यास झटा. ६ सच्छास्त्रादि व्यवहारचतुरांस मान द्या. ७ राजाज्ञेस. ८ चांगल्या लोकांना उत्तेजन द्या. ९ शकुन, मुहूर्त हे भ्रांतिकारक आहेत. ( हा वादग्रस्त विषय आहे.) १० आग्रहानें खोट्यास खरें ह्मणणारे ख्रिस्ती वगैरे. ११ आपल्या धर्माच्या बाहेरचे. १२ नका करूं. १३ साह्य द्या. १४ व्यापारांत सचोटी हीच कुशलता. १५ दुर्व्यसनांचा मार्ग चांगला नाहीं. १६ विश्वासघात कोणाचाही करूं नका. १७ आत्मश्लाघा ( आपली स्तुति ) ही करूं नका. १८ ह्मणजे आपल्या मुखानें आपली स्तुति करणाऱ्या इंद्रासही लघुत्व प्राप्त होतें.

कोर्टांमधिं शिरु नका ॥ व्यर्थ ह्या को० ॥
लढुन आपसामधीं[1] तुह्मी धन परक्याची करुं नका ॥
लेखीं गुंतूं नका ॥ कुणाशीं ले० ॥
गुंतलियावरि[2] त्यापरि चाला खोटें बोलूं नका ॥
स्तुतीस तुह्मि भुलुं नका ॥ मिथ्य त्या स्तु० ॥
जुलूम, अन्यायाचें वर्तन, पक्षपात, करुं नका ॥
चा० ॥ फाजील खर्च करुं नका ॥
लौकिकास विसरूं नका ॥ वाचणें[3] लिहिणें शिका ॥
मिळ० ॥ सत्कर्में हीं सर्व करुनियां सांभाळा कीर्ति ॥ ११ ॥
अपशब्द[4] न कधिं वदा ॥ मुखांतुनि अपशब्द न कधिं वदा ॥
सर्व जनांशीं गोड बोलणें ठेवावें सर्वदा ॥
एकस्त्रीव्रत[5] सदा ॥ असावें एकस्त्रीव्रत सदा ॥
दोन बायका[6] नका करूं हो प्राण गेलिया कदा ॥
न्यायें धन संपदा ॥ मिळवुनी न्यायें धन संपदा ॥
माय, बाप, गुरु, सज्जन, ईश्वर ह्यांच्या सेवा पदा ॥
चाल ॥ धरुं नका दुष्ट दुर्मदा[7] ॥
बुद्धिही असो धर्मदा[8] ॥ वाणीहि असावी सुधा[9] ॥
मिळवणी ॥ अविचाराचे कामीं कोणा नका देउं संमति ॥ ऐ० ॥ १२ ॥

---

१ एकमेकांत. २ कोणाशीं लेखीं गुंतूं नये परंतु गुंतल्यावर लेख ज्याप्रमाणें दिला त्याप्रमाणें वर्तणूक ठेवावी. ३ वाचणें, लिहिणें सांप्रतकाळीं उपयुक्त ह्मटलें ह्मणजे इंग्रजी होय, ह्यास्तव आपलें शिकून गुजाऱ्याकरितां इंग्लिश येणें हें फार उत्तम आहे. ४ मुखांतून अभद्र भाषण कधींही करूं नये. ५ एकपत्नीव्रतानें राहणारा जो भाग्यवान् तो केवल ब्रह्मचारीच समजावयाचा. ह्मणूनच "एकपत्नीस संन्यासी" असें ह्मटलें. ६ दोन बायका करणाऱ्याची जी फजिती तिचा अनुभव केव्हां केव्हां स्वतः येतो ! ७ वाईट प्रकारचा मद मग तो कोणताही असो. ८ धर्ममार्ग देणारी. ९ अमृत.

पतिला[१] किति सोडिती ॥ स्त्रिया त्या पतिला० ॥
पतिव्रताधर्मास आपल्या सर्वथैव मोडिती ॥
परपुरुषीं गोडि ती ॥ धरुनियां परपुरुषीं० ॥
लग्नाच्या पतिलागिं देति त्या मोडुनियां काडि[२] ती ॥
मग परके ताडिती[३] ॥ पुरुष त्या मग परके० ॥
तारुण्याची भरभर जाउनि मग रस्ते झाडिती[४] ॥
चाल ॥ मनिं धरा लाज थोडि ती ॥ संसाररूप जोडिती ॥
फुटलिया काय जोडि[५] ती ॥
यास्तव स्त्रीवर्गांत नसावी ऐशी ही दुर्मति ॥ ऐका० ॥ १३ ॥

सुधारणा ही करा ॥ स्वदेशीं सुधारणा ॥
निपुण करावे यांत्रिककर्मीं स्वदेशिं कारागिरां ॥
जपान देशा[६] स्मरा ॥ मनीं त्या जपान० ॥
कलाकुशलता किती वाढली विचार ह्याचा करा ॥
ही सच्छिक्षा[७] वरा ॥ मित्रहो ही सच्छिक्षा० ॥
सत्य मागणें मागा जोडुनि करद्वय प्रभुवरा ॥
चाल ॥ तुह्मि राष्ट्रहितातें स्मरा ॥ ह्या साठिं कसा[८] कंबरा ॥
ध्याऊनि मनीं ईश्वरा ॥
सत्य मागणें तुह्मांस देइल उदार हा भूपति[९] ॥ १४ ॥

अर्धांगी[१०] सुंदरा ॥ आपुल्या अ० ॥
त्यांचा गौरव[११] करूनि प्रीति त्यांच्याठायीं धरा ॥

---

१ नवऱ्याला सोडून कितीक तरी स्त्रिया जातात. २ काडी मोडून फारकती घेतात. ३ मारितात. ४ परक्यांच्या घरीं गेल्यावर कांहीं दिवसांनीं रस्ते झाडून उदर भरितात. ५ नफा. ६ जपानदेश थोड्या काळांत यांत्रिककलापटुत्वानें उदयास आला. ७ चांगलें शिक्षण. ८ वांधा. ९ पृथ्वीपति. १० स्वस्त्रिया. ११ सन्मान.

ज्या परक्या सुंदरा ॥ जगांतिल ज्या० ॥

माता, भगिनी समजा हा तर मार्ग सुखाचा बरा ॥

परधन समजा गरा ॥ सारखें प० ॥

धर्मी तत्पर सदा असावें ध्यावें विश्वंभरा ॥

चा० ॥ अपकीर्ति सुखा नाचरा ॥

सत्कीर्तिभयातें धरा ॥ छळूं नका व्यर्थ कधिं परा ॥

मिळ० ॥ सन्मार्गी चालल्या जगद्गुरु देइल तो सद्गति ॥ ऐ० ॥ १५ ॥

पवित्र आपण रहा ॥ मनानें प० ॥

जगद्वंद्य परमेश्वर सर्वा ठायीं भरला पहा ॥

सुबुद्धि सुमनें वहा ॥ तत्पदीं सु० ॥

वर्तन ठेवा असें जगीं कीं तुमची होइल चर्चा ॥

कामादिक रिपु सहा ॥ शरीरीं का० ॥

ह्यांची पीडा टाळा हे तरि घातक असती महा ॥

चा० ॥ सोइचा धरा मार्ग हा ॥

सद्बोधरूपस्वर्ग हा ॥ सन्मित्र करा भर्ग हा ॥

मिळ० ॥ ठेवा आपण प्रीति सदोदित पारख बळवंतीं ॥

ऐका व्यसनस्थिति ॥ जगाची ऐका व्यसनस्थिति ॥

दुर्व्यसनांनीं फार बिघडली सांप्रतकाळीं क्षिती ॥ १६ ॥

---

१ दुसऱ्या स्त्रिया. २ दुसऱ्याचें धन विषासारखें समजा. ३ अपकीर्ति करून त्यांत सुख जरी दिसलें तरी त्या सुखाचें आचरण करूं नका. ४ सत्कीर्तिभय ह्मणजे कीर्तिमान् लोकांना मोठी भीति असते ती त्यांनीं ठेवून चोख वर्तन ठेवावें हेंच सत्कीर्तिभय. ५ दुसऱ्याला कधींही व्यर्थ छळूं नका. ६ सर्व जगाचा गुरु परमेश्वर. ७ त्याच्या चरणीं. ८ मान्यता. ९ कामक्रोधादि षड्रिपु महाघातकी आहेत ह्यास्तव त्यांची पीडा टाळा ह्मणजे "काम असावा ईश्वरभजनीं" ह्याप्रमाणें त्यांना सन्मार्गी लावा. १० उत्तम बोध हाच स्वर्ग. ११ महादेव हा सन्मित्र करा. १२ पारख उपनांवाचा जो बळवंत त्याच्यावर आपण सदोदित प्रीति ठेवा.